
# शेतकरी कर्जमाफीसाठी आता ॲग्रीस्टॅकची अट नाही!



**मुंबई :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफीसंदर्भात राज्य सरकारकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. कर्जमाफीसाठी आता ॲग्रीस्टॅकची नोंदणी असणे ही अट राहणार नाही. ॲग्रीस्टॅक नसला तरी पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सुमारे दोन लाख शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी (दि.१८) मंत्रालयात माध्यमांशी बोलताना सांगितले. कर्जमाफी योजनेच्या लाभापासून एकही पात्र शेतकरी वंचित राहू नये यासाठी शासनाने हा निर्णय घेतला असून त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकरी कर्जमाफीच्या प्रक्रियेत यापूर्वी तांत्रिक अडचणी, कागदपत्रे आणि पात्रतेच्या निकषांमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. सरकारने यामध्ये अनेक सुधारणा केल्याचेही ना. बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ३३
www.ramprahar.com

◆ बुधवार, १९ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


अंतरंग


लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार अन् फसवणूक/२

मासळीची आवक वाढली; श्रावणामुळे पंचाईत/५

गॉल कसोटीत ऋषभ पंतने रचला नवा इतिहास/८


# राज्य मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.१८) राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध विकास प्रकल्पांसह पायाभूत सुविधा, सिंचन, क्रीडा, पुनर्वसन, वित्तीय सुधारणा आणि औद्योगिक क्षेत्राशी संबंधित अनेक महत्त्वाच्या निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

श्री क्षेत्र पंढरपूर येथील विशेष पुनर्वसन धोरणाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर आणि वाणिज्य संकुलाच्या विकास आराखड्यातील तीन हजार ९९३ कोटी ९० लाख रुपयांच्या कामांना गती मिळणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात ट्रेड्स प्लॅटफॉर्म प्रणालीचा वापर करण्यास



मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग तसेच कंत्राटदारांची प्रलंबित देयके वेळेत देणे अधिक सुलभ होणार आहे.

गडचिरोली येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध क्रीडा सुविधांच्या उभारणीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. सोलापूर शहरातील श्री जांबुमनी मोची समाज सेवा मंडळाला शैक्षणिक उपक्रमांसाठी

## पंढरपूरच्या विशेष पुनर्वसन धोरणाला मंजुरी

जागा देण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पुणे जिल्ह्यातील मौजे मोशी येथील १५ हेक्टर शासकीय जमीन क्रांतिवीर चापेकर समिती, क्रांतितीर्थ चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय आणि पुनरुत्थान समरसता गुरुकुलम अनुदानित आदिवासी आश्रम शाळेला देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

पुण्याला युसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिप २०३२ स्पर्धेच्या आयोजनाची संधी मिळणार आहे. या स्पर्धेचे आयोजन झाल्यास आशियातील पहिले यजमानपद भारताला मिळणार आहे. स्पर्धेच्या आयोजनासाठी शासनाकडून आर्थिक हमी, पायाभूत सुविधा आणि विविध धोरणात्मक बाबींना मान्यता देण्यात आली आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी सहा हजार ४७७ कोटी ८८ लाख रुपयांच्या आर्थिक तरतुदीला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियम २०१३मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. सन २०२४-२५ या हंगामात खरेदी करण्यात आलेल्या धान आणि भरडधान्यांच्या वाहतूक खर्चासाठी ३२८ कोटी ४७ लाख रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे अन्नधान्याच्या साठवणूक व वितरण प्रक्रियेला गती मिळेल. राज्य शासनाने वित्त विभाग आणि नियोजन विभागाची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला आहे.

# महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य कायदा रक्षाबंधनापासून होणार लागू

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांत वाढीस लागलेल्या धर्मांतराच्या प्रवृत्तीला पायबंद घालण्यासाठी राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर केलेल्या महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६चे कायद्यात रूपांतर झाले आहे. त्यानंतर येत्या २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर या नव्या कायद्याची राज्यभरात अंमलबजावणी सुरू होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने या वर्षाच्या सुरुवातीला मार्च महिन्यात विधानसभेत हे विधेयक

## अधिसूचना जारी

मांडले होते. बळजबरी, फसवणूक, आमिष, चुकीची माहिती देणे, अवाजवी प्रभाव किंवा कपटपूर्ण मार्गांनी केल्या जाणाऱ्या धर्मांतरास हा कायदा प्रतिबंध करतो.

या कायद्यांतर्गत लग्नाच्या बहाण्याने केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतरासाठी सात वर्षांपर्यंतचा कारावास आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. अल्पवयीन व्यक्ती, मानसिकदृष्ट्या अस्वस्थ व्यक्ती, महिला किंवा अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीतील व्यक्तीचे धर्मांतर केल्यास सात वर्षांपर्यंतचा कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. सामूहिक धर्मांतरासाठी सात वर्षांपर्यंतचा कारावास आणि पाच लाख रुपयांचा दंड अशी शिक्षा होऊ शकते. वैयक्तिक पातळीवर पुन्हा गुन्हा करणाऱ्यांना १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि पाच लाख रुपयांचा दंड होऊ शकतो.

विधेयकात लग्नाद्वारे किंवा लग्नाच्या आश्वासनाद्वारे केल्या जाणाऱ्या धर्मांतरासही प्रतिबंध घालण्यात आला आहे. एकूणच गैरप्रकारांना आळा लागेल.



मुंबई : रायगड जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांची भाजप महाराष्ट्र प्रदेश चिटणीस तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी भेट घेऊन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्यासमवेत रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील विकासकामे आणि लोककल्याणाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली.

## भाजप नेते विनोद तावडे उत्तर प्रदेशचे प्रभारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भाजपची नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी सोमवारी जाहीर करण्यात आली. यानंतर दुसऱ्याच दिवशी भाजप अध्यक्ष नितीन नबीन यांनी उत्तर प्रदेश, पंजाब आणि गुजरातसाठी नवीन राज्य प्रभारी आणि सह-प्रभारी यांची नियुक्ती केली आहे.

२०२७च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुका लक्षात घेता भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार विनोद तावडे यांची उत्तर प्रदेशचे प्रभारी आणि जगदीश ईश्वरभाई पटेल यांची सह-प्रभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सतीश पुनिया यांची पंजाबचे प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत, तर तरुण चुघ यांच्यावर गुजरातचे प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

## सर्पदंश 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्पदंशाच्या घटनांमुळे होणारे मृत्यू आणि अपंगत्व रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले असून सर्पदंशाला 'अधिसूचित आजार' म्हणून घोषित करण्यात आले आहे.



या निर्णयामुळे सर्पदंशाच्या घटनांचे प्रभावी संनियंत्रण, वेळेवर उपचार आणि सर्पविष प्रतिबंधक लस उपलब्धतेचे नियोजन अधिक सक्षम होणार असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना सर्पदंशाचा धोका अधिक असतो. सर्पदंशाची विषबाधा ही संभाव्यतः जीवघेणी स्थिती असून वेळेत निदान, योग्य प्रथमोपचार, तातडीने रुग्णालयात दाखल करणे आणि आवश्यकतेनुसार सर्पविष प्रतिबंधक लस उपलब्ध करून देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्पदंशाच्या घटनांची शास्त्रशुद्ध नोंद आणि त्यावर आधारित प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी शासनाने अधिसूचना लागू केली आहे.

## निवडक

### बीएचएमएस डॉक्टरांची एमएमसीमधील नोंदणी बंद

**मुंबई :** उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत राज्यातील बीएचएमएस डॉक्टरांची महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी)मधील नोंदणी तत्काळ प्रभावाने बंद ठेवण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे. होमिओपॅथी डॉक्टरांच्या मेडिकल कौन्सिलमधील समावेशाला इंडियन मेडिकल असोसिएशन आणि सेंट्रल मार्ड या एलोपॅथी डॉक्टरांच्या संघटनांनी विरोध दर्शवला होता. संभाव्य वाद टाळण्यासाठी प्रशासनाने मध्यस्थीचा मार्ग अवलंबला आहे.

### डॉ. दाभोलकर हत्या प्रकरण; मुख्य आरोपीला जामीन मंजूर

**मुंबई :** अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन अंदुरे याला मुंबई उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला तसेच त्याच्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली. दरम्यान, या निकालाविरोधात 'अंनिस'ने सर्वोच्च न्यायालयात जाण्याची भूमिका घेतली आहे.

## येत्या शनिवारी धोदाणी ते माथेरान इको-फ्रेंडली ट्रेक

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत निसर्गरम्य ट्रेकिंगची संधी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेत आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी धोदाणी ते माथेरान या इको-फ्रेंडली ट्रेकचे विशेष आयोजन येत्या शनिवारी (दि. २२) सकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. पनवेलचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत या ट्रेकिंगचा अनुभव सहभागी नागरिकांना घेता येणार आहे.

ट्रेकचा प्रारंभ धोदाणी बसस्टॉप येथील श्री राम मंदिर येथून होणार आहे. या ट्रेकच्या माध्यमातून निसर्गाशी जवळीक साधण्याबरोबरच युवकांमध्ये फिटनेस, साहस, पर्यावरण संवर्धन आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. निसर्गरम्य डोंगररांगा, हिरवाई आणि परिसरातील मनमोहक वातावरणाचा आनंद घेत मित्र-परिवारासह ट्रेकिंगचा अविस्मरणीय अनुभव घेण्याची ही संधी आहे.




'निसर्गाचा आनंद घ्या, निसर्गाचे संवर्धन करा' हा संदेश या उपक्रमातून देण्यात येणार आहे. या ट्रेकमध्ये सहभागी होण्यासाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून इच्छुकांनी https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSf6wlrBjIqKTccmhNqy7NMKL4kFAxUS8uDs-o5GGfK6m3v0g/viewform या गुगल फॉर्मद्वारे नोंदणी करावी. या पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी उपक्रमात नागरिकांनी, विशेषतः युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा

## दिव्या देशमुखसह १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रीडा क्षेत्रातील मानाच्या मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ची घोषणा अखेर केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाकडून करण्यात आली आहे. यंदा देशभरातील १७ नामांकित खेळाडूंना प्रतिष्ठित अर्जुन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. यंदा मेजर ध्यानचंद खेळरत्न पुरस्कार एकाही खेळाडूला देण्यात आलेला नाही.

अर्जुन पुरस्कार विजेत्यांमध्ये ग्रँडमास्टर दिव्या देशमुख, डेकॅथलॉनपटू तेजस्विन शंकर आणि बॅडमिंटनपटू गायत्री गोपीचंद यांच्यासह तेजस्विन शंकर (ॲथलेटिक्स), प्रियंका गोस्वामी (ॲथलेटिक्स), नरेंद्र (बॉक्सिंग), विदित गुजराथी (बुद्धिबळ), धनुष श्रीकांत (बधिर नेमबाजी), राजकुमार पाल (हॉकी), सुरजित (कबड्डी), रुद्रांश खंडेलवाल (पॅरा-नेमबाजी), एकता भयान (पॅरा-ॲथलेटिक्स), अरविंद सिंग



(नौकानय), ट्रीसा जॉली (बॅडमिंटन), लालरेमसियामी (हॉकी), मोहम्मद अजमल (ॲथलेटिक्स), पूजा (कबड्डी) यांचा समावेश आहे. १९ वर्षीय दिव्या देशमुखने गेल्या वर्षी जॉर्जियातील बटुमी येथे झालेल्या विश्वचषक स्पर्धेत ऐतिहासिक विजय मिळवत देशातील चौथी महिला ग्रँडमास्टर बनण्याचा मान मिळवला होता. दुसरीकडे तेजस्विन शंकरने नुकत्याच ग्लासगो येथे पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत डेकॅथलॉन प्रकारात ऐतिहासिक कांस्यपदक जिंकून भारताची मान अभिमानाने उंचावली आहे.

### दिग्गजांचाही सन्मान

१९६२च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय फुटबॉल संघाचे सदस्य राहिलेले दिग्गज फुटबॉलपटू आय अरुमनायागम यांना त्यांच्या योगदानाबद्दल जीवनगौरव अर्जुन पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ॲथलेटिक्स प्रशिक्षक परवीर सिंग, बॉक्सिंग प्रशिक्षक छोटे लाल यादव आणि नेमबाजी प्रशिक्षक नेहा नंदकुमार चव्हाण यांची द्रोणाचार्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे. अनुभवी बॉक्सिंग प्रशिक्षक धर्मेंद्र सिंग यादव आणि कुस्ती प्रशिक्षक वीरेंद्र कुमार यांना जीवनगौरव द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय, आर्मी पॅरालिम्पिक नोड, पुणे या संस्थेला राष्ट्रीय क्रीडा प्रोत्साहन पुरस्कार जाहीर झाला आहे.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा आधार

## अवयव प्रत्यारोपणासाठी ७९८ रुग्णांना १५.७९ कोटींची मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो, पण या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून त्यांच्या कुटुंबांनाही मोठा दिलासा मिळत आहे. १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ७९८ रुग्णांना १५ कोटी ७९ लाख ६६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.



- मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली.
- यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना तीन कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली.
- फुफ्फुस प्रत्यारोपणासाठी तीन रुग्णांना सहा लाख रुपयांची मदत देण्यात आली.
- हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

*अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान व अद्ययावत करण्यात आली आहे. गरजू रुग्णांनी १८००१२३२२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.*

***-रामेश्वर नाईक***, *कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष*

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये यासाठी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे.

विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचार गतीने होत आहेत.

## रीलसाठी लोकलच्या दिशेने दगड भिरकावणारा तरुण ताब्यात

**नवी मुंबई :** ट्रान्स हार्बर मार्गावरील दिघा परिसरात रील बनविण्यासाठी तरुणाने एका उपनगरी रेल्वेगाडीच्या दिशेने दगड भिरकावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेचे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित झाल्यानंतर ठाणे लोहमार्ग पोलिसांनी संबंधित तरुणाची ओळख पटवून त्याला चौकशीसाठी ताब्यात घेतले.

दिघा स्थानकाजवळ काही तरुण रेल्वे रूळाच्या परिसरात उभे राहून लोकलच्या दिशेने अश्लील शेरेबाजी करत असल्याचे या चित्रीकरणात दिसून येते. याचवेळी त्यातील एका तरुणाने गाडीच्या दिशेने दगड भिरकावल्याचा प्रकार उघडकीस आला. या घटनेचे चित्रीकरण प्रसारित झाल्यानंतर ठाणे लोहमार्ग पोलिसांनी संबंधित तरुणाची ओळख पटवून त्याला दिघा परिसरातून ताब्यात घेतले. रील बनविण्यासाठी हे कृत्य केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली.



पनवेल : येथील महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या नवीन दालनाचे उद्घाटन माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभागृहनेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, मधु पाटील, रवींद्र जोशी, अजय बहिरा, नगरसेवक मनोज भुजबळ, विजय खानावकर, सुमित झुंजारराव, समीर कदम, नगरसेविका राजश्री वावेकर, हेमलता गोवारी, रूचिता लोंढे आदी उपस्थित होते. उपस्थितांनी महापौर पाटील यांना शुभेच्छा दिल्या.

# मराठी जेन झीसाठी विशेष चित्रपट निर्मिती

## राज्य सरकार सहभागी होणार -मंत्री अॅड. आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी चित्रपटसृष्टीतील नव्या पिढीचा, विशेषतः जेन झी प्रेक्षकांचा वेध घेणारा तसेच आधुनिक तंत्रज्ञान, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि अन्य तांत्रिक माध्यमांचा प्रभावी वापर करणाऱ्या विशेष चित्रपटाच्या निर्मितीत महाराष्ट्र शासन सहभाग घेणार, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांनी केली.

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसंवादात ते बोलत होते. मराठी चित्रपटांचा दर्जा, गुणवत्ता, नावीन्य आणि अभिनय याबाबत कोणतीही कमतरता नसून व्यावसायिक यशासाठी आवश्यक असलेल्या 'कनेक्टिंग लिंक'वर काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मराठी चित्रपटसृष्टीने दर्जेदार आशय आणि नाविन्यपूर्ण मांडणीची परंपरा कायम ठेवली आहे. मात्र निर्मितीइतकाच




स्क्रीन, वितरण आणि प्रेक्षकवर्ग यांचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी व्यवहार्य मॉडेल तयार झाल्यास महाराष्ट्र शासन त्यात गुंतवणूकदार म्हणून भूमिका घेईल, असे मंत्री शेलार यांनी सांगितले.

मराठी चित्रपटांसाठी उपलब्ध स्क्रीनची संख्या, वितरण व्यवस्था आणि नव्या प्रेक्षकवर्गाची निर्मिती या मुद्द्यांवर व्यापक विचार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दक्षिण भारतीय चित्रपटांना मिळणाऱ्या भावनिक प्रेक्षक प्रतिसादाचा दाखला देत मराठी चित्रपटांसाठीही नव्या पिढीशी भावनिक नाते निर्माण करणारा प्रेक्षकवर्ग विकसित करण्याची आवश्यकता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म आणि आधुनिक तंत्रज्ञान हे चित्रपटसृष्टीसमोर आव्हान असले तरी त्याचे संधीत रूपांतर करणे आवश्यक आहे. यासाठी तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, त्याची उपयुक्तता आणि आव्हाने यावर प्रात्यक्षिकांसह चर्चासत्र व कार्यशाळा आयोजित करावी, अशी सूचना मंत्री अॅड. शेलार यांनी केली.

मराठी जेन झी प्रेक्षक अन्य भाषिक मनोरंजनाकडे वळण्याऐवजी मराठी चित्रपटांकडे आकर्षित व्हावा, यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि प्रभावी निर्मितीमूल्यांचा वापर करणारा चित्रपट निर्माण करणे गरजेचे आहे. अशा चित्रपटाच्या निर्मितीचा आर्थिक भार केवळ निर्मात्यांवर पडू नये, यासाठी राज्य शासन त्यात भूमिका घेईल, असेही मंत्री अॅड. शेलार यांनी सांगितले.

चित्रपट हा केवळ कला किंवा व्यवसाय नसून कला, तंत्रज्ञान, अर्थकारण, निर्मिती आणि संस्कृती यांचा सुरेख संगम आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळात चित्रनगरीची भूमिका केवळ चित्रीकरणासाठी जागा उपलब्ध करून देण्यापुरती मर्यादित न राहता चित्रपटसृष्टीसाठी संपूर्ण परिसंस्था निर्माण करण्याची आहे, असे मत फिल्मसिटीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी व्यक्त केले. स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही आणि ओटीटीच्या वाढत्या प्रभावामुळे चित्रपट निर्मिती, संकलन आणि आस्वादनाचे आयाम बदलले आहेत. या बदलांमुळे नवीन आव्हाने निर्माण झाली असली तरी त्यातून संधीही उपलब्ध होत आहेत, असे त्यांनी सांगितले.

चित्रनगरीकडून पायाभूत सुविधा, कौशल्य विकास, तंत्रज्ञान आणि 'ईझ ऑफ डुईंग बिझनेस' यावर काम केले जात असून, त्यासाठी पाच आधारस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. महामंडळ ५०व्या वर्षात पदार्पण करत असल्याचा अभिमान व्यक्त करताना, या परिसंवादातून चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी उपयुक्त विचारमंथन घडेल आणि मराठी चित्रपटसृष्टीला निश्चितपणे सुवर्णकाळ येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला फिल्मसिटीचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर, महेश मांजरेकर, अशोक राणे, मेघराज राजेभोसले, राजेश मापुस्कर, सुशांत शेलार तसेच चित्रकर्मी उपस्थित होते.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार अन् २२ लाखांची फसवणूक

**नवी मुंबई : बातमीदार**

लग्नाचे आमिष दाखवून एका महिलेवर लैंगिक अत्याचार करत तिची २२ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार कोपरखैरणे येथे उघडकीस आला आहे.

या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. वरुण रुहल (वय २५, रा. जेल कॉम्प्लेक्स, गोहाना रोड, सोनीपत, हरियाणा) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि आरोपी वरुण हे एकमेकांच्या ओळखीचे होते. २१ फेब्रुवारी २०२४ ते ७ एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपीने कोपरखैरणे येथील हॉटेलात तसेच गुरुग्राम (हरियाणा) येथील वेगवेगळ्या ठिकाणी पीडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवले. तिचे शोषण करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

याशिवाय, लग्नाचे आमिष दाखवून विविध कारणे सांगत आरोपीने महिलेला भावनिक साद घातली. तिच्याकडून वेगवेगळ्या बँकांचे क्रेडिट कार्ड आणि पर्सनल लोनद्वारे तब्बल २२ लाख रुपये काढण्यास भाग पाडले. ही रक्कम त्याने स्वतःच्या फायद्यासाठी वापरून महिलेची मोठी आर्थिक फसवणूक केली.

आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पीडितेने कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्निल बेडसे या प्रकरणाचा अधिक तपास करत सध्या आरोपीचा शोध पोलीस करत आहेत.

## ऐरोलीत निवृत्त कर्मचाऱ्याचे नऊ लाखांचे सोन्याचे दागिने चोरीला

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रवासादरम्यान संधी साधून अज्ञात चोरट्याने एका निवृत्त कर्मचाऱ्याच्या बॅगेतून सुमारे ९ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लांबवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऐरोली येथील सेक्टर-०५ मधील वनराई को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीत राहणारे ८१ वर्षीय निवृत्त नागरिक चंद्रकांत शटवाजी कुट्रे हे १२ ऑगस्ट २०२६ रोजी बेळगाव (कर्नाटक) ते ठाणे असा ट्रेनने प्रवास करून घरी आले त्यानंतर १३ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता त्यांनी आपल्या बॅगेतील साहित्याची तपासणी केली असता, बॅगेत एका प्लास्टिकच्या बॉक्समध्ये सुरक्षित ठेवलेले सोन्याचे दागिने गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.१५ ग्रॅम वजनाचा सोन्याचा हार, ४० ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बांगड्यो, ५ ग्रॅम वजनाचे कानातील रिंग आणि वेल एकूण ९ लाख रुपये किमतीचे दागिने अज्ञाताने लबाडीच्या इराद्याने चोरून नेल्याचे स्पष्ट झाल्यानंतर कुट्रे यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

ठाणे रेल्वे पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या या गुन्ह्याचे हस्तांतरण झाल्यानंतर आता रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण काकडे करत आहेत.

## जलजीवन योजना निधीचा योग्य विनियोग करा -खासदार सुनील तटकरे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'हर घर जल' अभियानांतर्गत मंजूर झालेल्या जलजीवन मिशनच्या योजनांचा निधी योग्य पद्धतीने वापरून त्या निर्धारित वेळेत पूर्ण करा. मंजूर निधीचा योग्य विनियोग करून योजना यशस्वी न झाल्यास भविष्यात केंद्र सरकारकडून पुढील ३० वर्षे या योजनेसाठी निधी मिळणार नाही, अशी स्पष्ट सूचना रायगडचे खासदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अधिकारी व लोकप्रतिनिधींना दिली. आयोजित बैठकीत काही अधिकाऱ्यांकडून समाधानकारक



माहिती न मिळाल्याने खासदार तटकरे यांनी संताप व्यक्त करत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरून आपल्या कामात सुधारणा करा अशा सूचना दिल्या.

श्रीवर्धन शासकीय विश्रामगृहात श्रीवर्धन तालुक्यातील विविध विकासकामे व पाणीपुरवठा योजनांचा आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काची जागा मिळालीच पाहिजे वन हक्क कायद्या अंतर्गत आदिवासी बांधवांना त्यांच्या हक्काची जागा त्यांना मिळाली पाहिजे असे स्पष्ट निर्देश खासदार सुनिल तटकरे यांनी प्रांताधिकारी, तहसीलदार, वनाविभागाचे अधिकारी यांना बैठकीत दिले. तसेच आदिवासी वाड्यांवर जाऊन तेथील प्रत्यक्ष वस्तुस्थिती समजून घेऊन आदिवासी बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समितीचे सभापती, सदस्य यांनी पुढाकार घेतला पाहिजे असेही खा. तटकरे यांनी सुचित केले.

रानावनात काबाड कष्ट करणाऱ्या आदिवासी बांधवांच्या वस्त्यांच्या संदर्भात योग्य तो आराखडा तयार करून संबंधित विभागाचे केंद्रीय मंत्री यांची आपण स्वतः भेट घेणार असून समस्या सोडविण्यावर भर दिला जाईल असा विश्वास खासदार सुनिल तटकरे यांनी आढावा बैठकीत व्यक्त केला. परिणामी येत्या काळात आदिवासी बांधवांच्या समस्या मार्गी लागण्याचे संकेत या बैठकीतून मिळाले आहे. आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत जलजीवन मिशन योजना, आदिवासी वनहक्क कायदा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळीउपस्थित महम्मदभाई मेमन,उदय बापट,राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष मंदार तोडणकर,माज आमदार तुकाराम सुर्वे, माजी नगराध्यक्ष जितेंद्र सातनाक,बाळकृष्ण चाचले,उपनगराध्यक्ष अनंत गुरव, नगरसेवक,नगरसेविका, कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ. भालेराव यांचे महसूल अधिकाऱ्यांना ताण-तणाव नियोजन कौशल्य मार्गदर्शन

**रोहा : प्रतिनिधी**

नेहमीच आपण कोणत्या ना कोणत्या तरी ताण तणावात असतो. परंतु काम करत असताना आपण दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्याकडे सकारात्मक बघितल्यास तर जीवन सुखकार होईल असे प्रतिपादन डॉ अरुंधती भालेराव यांनी ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे केले.

रायगड जिल्हाधिकारी किसनराव जावळे व रोहा उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवल यांच्यावतीन आयोजित ताणतणावांचे नियोजन आणि जीवन कौशल्य कार्यशाळेत रोहा, सुधागड मंडळ अधिकारी व कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांना मार्गदर्शन करताना प्रारंभ कला अकॅडमीच्या संचालिका डॉ अरुंधती भालेराव यांनी व्यक्त केले.यावेळी नायब तहसीलदार राजेश थोरे, वैशाली काकडे, उज्वला अंधारे यासह रोहा व सुधागड तालुक्यातील मंडळ अधिकारी उपस्थित होते



ताणतणावांचे नियोजन आणि जीवन कौशल्य कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ अरुंधती भालेराव यांनी विविध अधिकाऱ्यांचे खेळ घेत अधिकाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण केला. त्यांनी हे खेळ घेत असताना प्रत्येकाने आयुष्याकडे सकारात्मक बघायचे आवश्यक आहे.काम करताना आपला दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. काम समजून घेणे आवश्यक आहे. प्रत्येकाने कामातच संधी निर्माण करणे, ऐकणे, बघणे, लक्ष देऊन बघणे, ध्येय समोर, एकाग्रता ठेवणे या विषयावर सविस्तर अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

## मोबाईल व्हॅनव्दारे कॅन्सर तपासणी आता होणार घराजवळ; नवी मुंबईत विशेष मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेची रुग्णालये व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर राष्ट्रीय असांसर्गिक रोग तपासणी कार्यक्रमांतर्गत ३० वर्षावरील स्त्री व पुरुषांची नियमित तपासणी करण्यात येते व त्याची नोंदणी पोर्टलवर करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह, मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग याविषयी तपासणी व चाचण्या करण्यात येत आहेत तसेच संशयित रुग्ण आढळल्यास सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ येथे संदर्भित करण्यात येत आहे.

या तपासणीमध्ये अधिक भर घालत दि. ३ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत शासनामार्फत कॅन्सर व्हॅन नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात पाठविण्यात आली होती. या अनुषंगाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वतीने नमुंमपा क्षेत्रात ठिकठिकाणी कॅन्सर तपासणी मोहीम यशस्वीरीत्या राबवण्यात आली.या कॅन्सर तपासणी विशेष मोहिमेत नवी मुंबईतील १,२९२ नागरिकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून स्वतःची आरोग्य तपासणी करून घेतली.

सदर व्हॅन मध्ये मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग बाबत तपासणी व चाचण्या करण्यात आल्या. या मोहिमेचे आरोग्य विभागामार्फत खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले होते .कर्करोग हा वेळीच ओळखला तर पूर्णपणे बरा होऊ शकतो. योग्य वेळी केलेली तपासणी भविष्यातील मोठा धोका टाळू शकते. म्हणूनच, जे नागरिक किंवा महिला या मोहीमेत तपासणी करायच्या राहून गेल्या असतील, त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका रूग्णालयात उपलब्ध असलेल्या मोफत आरोग्य सेवा आणि तपासण्यांचा लाभ घ्यावा. तंबाखू, सुपारी यांसारख्या व्यसनांपासून दूर रहावे आणि शरीरात काहीही असामान्य बदल दिसल्यास लगेच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ३० वर्षावरील सर्व स्त्री, पुरूष नागरिकांनी असांसर्गिकरोग तपासणी कार्यक्रमांतर्गत आपल्या जवळच्या नमुंमपा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी असे आवाहन महापौर श्रीम.सुजाता पाटील आणि आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे

## अलिबाग येथे आज जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

स्थानिक पातळीवर शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागांच्या सहाय्याने "जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-२०२६ चे आयोजन दि.१९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:०० वा. पासून जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले असल्याची माहिती सहायक आयुक्त, जिल्हा उद्योग केंद्र, जी.एस. हरळय्या यांनी दिली आहे.

उद्योग आयुक्तालया मार्फत महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीच्या संधी, राज्यातील उत्पादने यांची निर्यातवृध्दी तसेच औद्योगिक विकासाकरीता गतवर्षी एप्रिल- २०२५ दरम्यान जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यांतील परिषदामध्ये ३७४२ सामंजस्य करारांवर स्वाक्ष-या होऊन रु. १,२७,३२२ कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित झाली असून त्यात ३,२०,५६१ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

विभागस्तरीय गुंतवणूक परिषद-२०२५ सहा विभागीय मुख्यालयाचे ठिकाणी मार्च-२०२५ मध्ये आयोजित करण्यात होत्या. या गुंतवणूक परिषदेस मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड श्रीमती नेहा भोसले, जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीमती आँचल दलाल, सह आयुक्त (उद्योग व सेवा) कोकण विभाग, ठाणेसंदीप पाटील उपस्थित राहणार आहेत.

## पेणच्या सुबोध विद्यालयात बेल महोत्सव उत्साहात साजरा

**पेण : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील पहिल्या श्रावणी सोमवारी पेण तालुक्यातील निसर्गमित्र उदय मानकावळे यांनी शहरातील शिक्षण महिला समितीचे सुमतीबाई देव या शाळेमध्ये पेण पालिकेच्या महिला व बालकल्याण सभापती कलावती पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत " बेल महोत्सव" साजरा करून शाळेतील विद्यार्थ्यांना बेलाच्या झाडांचे वाटप केले. यावेळी सभापती कलावती पाटील यांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्व पटवून देऊन झाडे लावून त्यांची जोपासना करण्याचा सल्ला दिला.

सोमवार हा भगवान शंकराचा दिवस म्हणून ओळखला जातो आणि त्यातच विशेष करून श्रावणी सोमवारी भगवान



शंकराला वाहण्यासाठी बेलाची पाने आवश्यक असल्याने या झाडाला महत्त्व प्राप्त झालेले असते. त्यामुळे निसर्गमित्र उदय मानकावळे यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील शालेय विद्यार्थ्यांना असंख्य बेलाच्या झाडांचे वाटप करून ती झाडे वाढविण्याचे आवाहन केले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख सभापती कलावती पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बेलाच्या झाडासह इतर झाडांपासून मिळणारे ऑक्सिजन,सावली, औषधी म्हणून वापर, नैसर्गिक समतोल आदी गोष्टींचे महत्व पटवून दिले आणि ही झाडे वाढवून त्यांची निगा असे आवाहन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता घोडके,सहशिक्षिका प्रज्ञा कावतकर, हितेश पाटील उपस्थित होते.

## देवळी येथे हनुमान व्यायामशाळा सेल्फी पॉइंटचे उदघाट्न

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील देवळी येथे तरुणांसाठी उभारण्यात आलेल्या हनुमान व्यायामशाळेचे उद्घाटन राजिप कृषी व पशुसंवर्धन समिती सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच जुई अब्बास गावाजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या 'आय लव्ह जुई' सेल्फी पॉईंटचेही उद्घाटन करण्यात आले.

देवळी येथे सभापती वैकुंठ पाटील यांचे ग्रामस्थ व तरुण मंडळींनी फटाक्यांची आतषबाजी करीत शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी वैकुंठ पाटील म्हणाले की, नवीन पिढीने प्रगत होण्याबरोबरच शारीरिक दृष्ट्याही सक्षम व सुदृढ होणे गरजेचे आहे. आजची पिढी मैदानी खेळांपासून काही प्रमाणात




वंचित आहे. देवळीतील तरुणांनी शरीर सुदृढ ठेवण्यासाठी सुरू केलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

किरण तुरे सातत्याने विविध उपक्रम राबवून समाजकार्य करीत असल्याचेही त्यांनी सांगितले. नवीन व्यायामशाळेसाठी जागा उपलब्ध असल्यास आवश्यक परवानग्या मिळवून देण्यासह सहकार्य करण्याचे आणि तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभे राहाण्याचे आश्वासन पाटील यांनी दिले. दरम्यान, जुई अब्बास गावाजवळ उभारण्यात आलेल्या 'आय लव्ह जुई अब्बास' सेल्फी पॉईंटमुळे परिसराच्या आकर्षणात भर पडणार असून नागरिक व पर्यटकांसाठी हे नवे आकर्षण ठरेल, असे सभापती पाटील यांनी सांगितले.

यावेळी सरपंच वसंत गावंड, माजी सरपंच व विद्यमान सदस्य किरण तुरे, देवळी गावचे खजिनदार धनाजी तांडेल, रामचंद्र तांडेल, नीरज तांडेल, पंकज तांडेल, संतोष शिवकर, नरेश तुरे, सुरेंद्र तुरे, रामचंद्र तांबोळी, दिलीप तांडेल, आर्यन तुरे, मिलिंद तुरे, नितेश तांडेल, सुनील तुरे, गणेश तांडेल, अजय तुरे आदी ग्रामस्थ व तरुण उपस्थित होते.

# गव्हाणमध्ये पहाटे सशस्त्र दरोडा

## चाकूचा धाक दाखवून सोने आणि रोकड लंपास; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

गव्हाण गावात मंगळवारी पहाटे सशस्त्र दरोड्याची धक्कादायक घटना घडल्याने परिसर हादरला आहे. पहाटेच्या सुमारास चार अनोळखी दरोडेखोरांनी घरात घुसून चाकूचा धाक दाखवत कुटुंबीयांना धमकावले आणि सुमारे पाच तोळे सोन्याचे दागिने व दोन लाख रुपये रोख असा लाखो रुपयांचा ऐवज लुटून पोबारा केला.



गव्हाण येथील शेवंताबाई कोळी (वय ५३) यांच्या घराला चोरट्यांनी पहाटे सुमारे ३ वाजता लक्ष्य केले. घरातील व्यक्ती झोपेत असतानाच चार जण घरात घुसले. अचानक चाकू समोर काढून धमकावल्याने कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. दरोडेखोरांनी घरातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम ताब्यात घेतल्यानंतर घटनास्थळावरून पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच उलवा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, आरोपींच्या हालचाली आणि पळून जाण्याच्या मार्गाचा मागोवा घेतला जात आहे. तांत्रिक तपासाच्या आधारेही आरोपींचा शोध सुरू आहे.

गव्हाणसारख्या रहिवासी परिसरात पहाटे घरात घुसून चाकूच्या धाकावर दरोडा टाकण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड दहशत आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# सेबी अधिकारी असल्याचे भासवून ज्येष्ठ नागरिकाला २९ लाखांचा गंडा

**उरण : बातमीदार**

उरण येथील बोरी नाका परिसरात राहणाऱ्या ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला टेलिकॉम कंपनी आणि सीबीआय अधिकाऱ्याच्या नावाने धमकी देऊन तब्बल २९ लाख ३६ हजार ९४ रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात अनोळखी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी शांताराम हे उरण येथे राहत असून ते सेवानिवृत्त आहेत. दिनांक १४ जुलै २०२६ रोजी दुपारी २.४५ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाईलवर अनोळखी क्रमांकावरून एका महिलेचा फोन आला. सदर महिलेने स्वतःला टेलिफोन निगममधून बोलत असल्याचे सांगितले आणि शांताराम या नावाने मुंबईत एक बनावट सिमकार्ड वापरले जात असल्याचे सांगून धमकी दिली.

या फोननंतर काही दिवसांनी वेगवेगळ्या क्रमांकावरून वेगवेगळ्या व्यक्तींचे कॉल येण्यास सुरुवात झाली. त्यांनी शांताराम म्हात्रे यांना सांगितले की संदीप कुमार नावाच्या व्यक्तीच्या मनी लॉन्ड्रिंग, ड्रग्ज स्मगलिंग आणि वुमन ट्रॅफिकिंग या गुन्ह्यात त्यांच्या नावाने आयसीआयसीआय बँकेत ७८ लाख रुपये जमा झालेले आढळून आले आहेत आणि यात त्यांना अटक होऊ शकते.

या भीतीपोटी आणि अधिकाऱ्यांच्या धाकाने शांताराम यांनी १४ जुलै ते १२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत वेगवेगळ्या वेळी आरोपींनी सांगितलेल्या बँक खात्यांमध्ये एकूण २९ लाख ३६ हजार ९४ रुपये जमा केले. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी १७ ऑगस्ट रोजी उरण पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# लॉकपमध्ये ठेवत असताना पोलीस ठाण्यातून आरोपी पळाला

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्यायालयातून आरोपीला हजर करून पोलीस ठाण्यात आणले असता कळंबोली पोलीस ठाण्यातून आरोपी पळाल्याची घटना रविवारी १६ ऑगस्ट रोजी घडली. कळंबोली पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल करून त्याला १७ ऑगस्ट रोजी त्याला पुणे येथून अटक केली.

चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी (इरफान मोहम्मद जाकीर शेख मन्सुरी उर्फ मँगो वय १९ रा. रोडपाली गाव) याला कळंबोली पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यात अटक केली होती. या आरोपीला कळंबोली पोलिसांनी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी दिल्यानंतर दुपारी चारच्या सुमारास त्याला पोलीस कोठडीत (लॉकअपमध्ये) ठेवत असताना तो तेथून पळून गेला.



पोलीस ठाण्यातून आरोपी पळून गेल्याने त्याला पकडण्याचे आव्हान पोलिसांसमोर होते. पोलिसांच्या पथकाने पुणे येथून या आरोपीला ताब्यात घेतले असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी दिली. आरोपी लघु शंकेला जातो असे सांगून पळून गेल्याची माहिती त्यांनी दिली.

# वीज चोरीप्रकरणी एकावर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनधिकृतपणे वीज जोडणी करून वीज चोरी केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे आर्थिक नुकसान केल्याचा आरोप संबंधितावर करण्यात आला आहे.अब्दुल रेहमान अब्दुल लतीफ पटेल (वय ६५, रा. घर नं. ३२९, मेहबूब मियाँ चाळ, पाडा मोहल्ला, पनवेल) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीने अनधिकृतपणे वीज जोडणी करून ३२२ युनिट वीज चोरी केली असून, त्यामुळे सुमारे २३,०९० रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी वीज कायदा २००३ मधील कलम १३५ अन्वये पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सरकारी बँकेत नोकरीला लावतो सांगून केली ३१ लाखांची फसवणूक

## वसईच्या बीडीओला अटक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सरकारी बँकेत नोकरीला लावतो असे सांगून दोघांनी ३१ लाख १७ हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी वसई येथील गटविकास अधिकारी (बीडीओ) यांना पनवेल शहर पोलिसांनी १५ ऑगस्ट रोजी अटक केली. न्यायालयात हजर केले असता त्यांना १९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. यातील आणखी एक साथीदार अनिल कचरे हा फरार असून त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

करंजाडे येथे राहणारे ग्रामसेवक परमेश्वर जाधव यांच्या मुलीला सरकारी बँकेत नोकरी लावून देतो असे सांगून आरोपी छत्तरसिंग सुखलाल राजपूत (वय ५५) आणि अनिल कचरे यांनी २०२३ पासून जाधव यांच्याकडून ३१ लाख १७ हजार रुपये घेतले. यावेळी त्यांच्या मुलीला बँक ऑफ बडोद्याच्या शाखेत कामावर पाठवण्यात आले. मात्र तिला शासनाकडून पगार येत नव्हता. खाजगी पगार येत असल्याने याची विचारणा जाधव यांनी राजपूत यांच्याकडे केली तसेच तिला बँक ऑफ बडोदाचे बनावट अपॉइंटमेंट लेटर देखील देण्यात आले होते.

याबाबत परमेश्वर जाधव यांनी राजपूत यांच्याकडे शासकीय नोकरी लावण्यासाठी घेतलेल्या पैशांची विचारणा केली. यावेळी राजपूत यांनी टाळाटाळ केली. त्यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क देखील होत नव्हता. फसवणूक झाल्याचे जाधव यांच्या लक्षात आले. त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतवार, पोलीस हवालदार उमेश पाटील, पोलीस नाईक प्रमोद साबळे यांनी १५ ऑगस्ट रोजी आरोपी सत्तरसिंग राजपूत याला वसई येथून ताब्यात घेऊन अटक केली. याप्रकरणी पोलिसांचा अधिक तपास सुरू आहे.

# सीकेटी कॉलेजमध्ये वाणिज्य मंडळाचे उद्‌घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या वाणिज्य मंडळाचे १८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता उद्‌घाटन करण्यात आले.



या कार्यक्रमाप्रसंगी पिल्लई महाविद्यालय, रसायनीच्या प्राचार्या मा. प्रा. (डॉ.)रिंकू शंतनू यांची प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.(डॉ.) एस. के. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख प्रो.(डॉ.)एस.बी. यादव, व्यावसायिक अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रो.(डॉ.) अजय दीक्षित, लेखा व वित्त विभाग प्रमुख डॉ. निलेश कोळी, व्यवस्थापन विभाग प्रमुखप्रा. कुशलकुमार कुराणी आणि वाणिज्य मंडळाच्या प्रमुख प्रा. पूजा आचार्य इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सदर केलेल्या पाहुण्यांच्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर वाणिज्य मंडळाच्या अध्यक्षा प्रा. पूजा आचार्य यांनी वाणिज्य विभागाचीओळख करून दिली व भविष्यातील होणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. यावेळी हेरॉल्ड अंकाचे अनावरण झाले. या प्रसंगी सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वाणिज्य आणि अर्थशास्त्र विषयाची सांगड घालत पथनाट्य सदर केले.

या कार्यक्रमाप्रसंगी पिल्लई महाविद्यालय, रसायनीच्या प्राचार्या. प्रा.(डॉ.) रिंकू शंतनू यांनी त्यांच्या संबोधनात वाणिज्य क्षेत्रातील उत्क्रांती, तांत्रिक बदल तसेच बाजारातीलबदलते कल, तसेच जागतिक स्तरावर होणाऱ्या युद्धांचा युरोपियन राष्ट्रांवर झालेला परिणाम व भविष्ययांवर प्रतिपादन केले, तसेच वस्तू विनिमय, आधुनिक जगातील वाणिज्य क्षेत्रातील होणारे बदल यावरप्रकाश टाकला. तसेच, त्यांनी जुन्या काळातील आणि आधुनिक काळातील व्यवहाराच्या बदलत्या कलांचाआढावा घेतला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य (डॉ.)एस.के.पाटील यांनीमहाविद्यालाची व संस्थेची ओळख करून दिली.दरम्यान, दर वर्षीप्रमाणे या वर्षी हि पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि मोडेल मेकिंग स्पर्धांचे आयोजनकरण्यात आले होते. विजेत्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजुम शेख या विद्यार्थिनीने केले तसेच राधिका शर्मा या विद्यार्थिनीने कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

# कळंबोलीत हर घर तिरंगा आणि नशामुक्त भारत जनजागृती महारॅली

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत 'हर घर तिरंगा' तसेच 'नशामुक्त भारत Say No To Drugs' या जनजागृती अभियानाच्या माध्यमातून कळंबोली शहरात मंगळवारी, दि. १८ ऑगस्ट रोजी भव्य जनजागृती महारॅलीचे आयोजन करण्यात आले होते .

सुधागड विद्यासंकुल, कळंबोली, सर्व माध्यम ज्युनियर कॉलेज आणि SMDL सिनियर कॉलेज, कळंबोली पोलिस यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेत देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि नशामुक्तीचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविला. 'Say No To Drugs', 'नशामुक्त भारत' 'वंदे मातरम' "भारत माता की जय" यांसारख्या घोषणांनी कळंबोली परिसर दुमदुमून गेला. व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करत युवकांनी निरोगी, सुरक्षित आणि व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीचा संदेश दिला.



या जनजागृती रॅलीमध्ये सुधागड विद्यासंकुलाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, नगरसेवक रामदास शेवाळे, विजय खानावकर, तसेच नगरसेविका सरस्वती कथारा, सायली सरक, दमयंती भोईर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सुधागड विद्यासंकुलातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रॅलीत सहभागी होत 'हर घर तिरंगा'चा देशभक्तीचा संदेश आणि 'नशामुक्त भारत'चा सामाजिक संकल्प नागरिकांपर्यंत पोहोचविला. विद्यार्थ्यांनी देशभक्तांचे वेश परिधान करून जनजागृतीपर घोषणा देत व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

आजच्या युवा पिढीसमोर अमली पदार्थांचे वाढते आकर्षण ही गंभीर सामाजिक समस्या बनत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती करणे आणि व्यसनमुक्त समाजासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश होता. 'नशेला नाही, जीवनाला होकार' देण्याचा संदेश या रॅलीतून देण्यात आला.


## निवडक

### अवैध दारू विक्रीवर पोलिसांची कारवाई

**पनवेल :** करंजाडे परिसरात अवैधरीत्या दारू विक्री करणाऱ्यावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत देशी दारूसह मॅकडॉवेल नंबर-१ आणि रॉयल स्टॅग डिलक्स व्हिस्कीच्या बाटल्या असा एकूण ७ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका इसमाविरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जेएनपीटी रोडजवळील करंजाडे गावातील आरएमसी प्लॉट, निलेश धाब्याबाहेरील मोकळ्या जागेत करण्यात आली.याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### करंजाडेतून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे सेक्टर ६ परिसरातील विशाल चाळ येथून १८ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नीलम नंदलाल प्रजापती (वय १८ वर्षे, ६ महिने) ही तरुणी करंजाडे सेक्टर ६ येथील विशाल चाळ येथून घराबाहेर गेली. त्यानंतर ती घरी परतली नाही.तरुणीच्या कुटुंबीयांनी परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला; मात्र तिचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे तिची आई सुनीता नंदलाल प्रजापती (वय ४७) यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत माहिती दिली. ती हिंदी व भोजपुरी भाषा बोलते. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.



# हातमाग व यंत्रमाग कापड प्रदर्शनास उत्तम प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथे एक वर्षानंतर सोलापूरच्या भाऊराया हँडलूमच्या हातमाग व यंत्रमाग कापड भव्य प्रदर्शन व विक्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. वाढता प्रतिसाद पाहता हे प्रदर्शन ३० ऑगस्ट पर्यंत वाढविण्यात आले.

राज्यस्तरावरील सोलापूरचे भाऊराया हँडलूम यांच्या हातमाग व यंत्रमागावरील कापडाने आपल्या नावीन्यपूर्ण उत्पादनामुळे नावलौकिक मिळवलेला आहे. सिंधुदुर्ग, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यातही हे प्रदर्शन नावारूपास आले आहे.आकर्षक ऑफर सहयोगी संस्थेतर्फे या प्रदर्शनात सर्व कपड्यांवर २०% विशेष सूट दिली जात आहे.

उपलब्ध साहित्य कॉटन इरकली साडी, पटोला कॉटन साडी, इरकली कॉटन ड्रेस मटेरिअल, खादी कॉटन साडी, सिल्क कॉटन साडी, लिनन साडी, खादी सिल्क साडी, तसेच बेडशिट, सतरंजी, टॉवेल, पंचा, लुंगी, प्रिंट बेडशिट तसेच खादी शर्ट, कुर्ता पाईजामा, लेडीज बॅग, गाऊन, टॉप, आणि सोलापुरी चादरीचे शेकडो प्रकार येथे पाहायला मिळतील. कलावाधी व वेळ हे प्रदर्शन दि. ३० ऑगस्ट पर्यंत दरम्यान रोज सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत ग्राहकांसाठी उघडे राहील.

सण-उत्सवाच्या काळात पनवेलकरांना एकाच छत्राखाली दर्जेदार कापड स्वस्त दरात उपलब्ध करून दिल्याबद्दल मान्यवरांनी आयोजकांना शुभेच्छा दिल्या. स्थानिक नागरिक आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# कॅनरा बँक विद्या ज्योती शिष्यवृत्ती विद्यार्थिनींना प्रदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या , न्यू इंग्लिश स्कुल ,मार्केटयार्ड , पनवेल विद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मधील वार्षिक निकाल मध्ये इयत्ता पाचवी ते.दहावी मधील एससी व एसटी संवर्गातील प्रथम आलेल्या विद्यार्थिनींना कॅनरा बँक विद्या ज्योती शिष्यवृत्ती दरवर्षी देण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ मधील सदरची शिष्यवृत्ती या शाळेतील विद्यार्थिनींना कॅनरा बँक मुख्यालय बीकेसी मुंबई येथे आयोजित मुख्य सोहळ्यात नुकतीच प्रदान करण्यात आली.

या शिष्यवृत्तीचे स्वरूप इयत्ता पाचवी ते सातवी मधील विद्यार्थिनी मधील प्रथम मुलीसाठी प्रत्येकी रुपये तीन हजार तर इयत्ता आठवी ते दहावी मधील प्रथम मुलींसाठी प्रत्येकी रुपये पाच हजार असे आहे. या विद्यालयात एसएसी व एसटी संवर्गातील मुलींसाठी एकूण रुपये चोवीस हजार रुपयाची एकूण शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

या कार्यक्रमासाठी श्री राजेश टी. पाली ,आय. एस. आर.सह आयुक्त इन्कम टॅक्स मुंबई आणि कॅनरा बँकेचे मुख्य व्यवस्थापक उपस्थित होते.

# आपटा प्राथमिक केंद्रात जन आरोग्य समितीची मीटिंग

**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा प्राथमिक आरोग्य केंद्र येथे जन आरोग्य समितीची मीटिंग जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर व अन्य पदाधिकारी यांचे उपस्थितीत झाली .

यावेळी आपटा आरोग्य केंद्रासाठी तीन संगणक एक लॅपटॉप तसेच पाण्याची टाकी स्वच्छ करणे गॅस शेगडी दुरुस्ती करणे रुग्णांसाठी गरम पाण्याची सुविधा देणे इन्वर्टर दुरुस्त करणे सौर ऊर्जा प्रणाली बंद आहे ती जोडून देणे प प्रसुती कक्षासाठी एक एअर कंडिशनर उपलब्ध देणे शस्त्रक्रिया कक्षामध्ये एयर कंडीशन सर्विसिंग करून घेणे प्राथमिक आरोग्य केंद्र मध्ये पेस्ट कंट्रोल करणे आरोग्य केंद्र १० खुर्च्या पाच खालील टेबलावर १०० प्लास्टिकच्या खुर्च्या देणे व आरोग्य केंद्राचे फायनल ऑडिट करणे इलेक्ट्रिकल ऑडिट करणे स्ट्रक्चरल ऑडिट करणे आणि आरोग्य केंद्र आणि दोन बीपीची उपकरणे मान्य केले.प्रयोगशाळा तंत्रज्ञान कक्षाची आणि आरोग्य विभागाची जे फर्निचर ,दरवाजे खराब होते ते दुरुस्ती यावर चर्चा झाली .



यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर जिल्हा परिषद सदस्य अनन्या अविनाश गातडे , मयूर परशुराम शेलार, पंचायत समिती सदस्य. वैदही विक्रांत घरत केळवणे ,प्रताप हातमोडे सरपंच गिरवले, गुरुनाथ गीतांजली गाताडे सरपंच वावेघर, वंदना शरद वाघे प्रशासक आपटा गुरुनाथ ठाकूर केळवणे सरपंच. ज्ञानेश्वर भोईर विजय मुरकुटे ,असद पिट्टू, करण शेलार, राजा देशमुख आणि आरोग्य अधिकारी अस्मिता पवार डॉक्टर उन्नती चव्हाण ,स्वाती आडेलक ,सर्व कर्मचारी ,आशा वर्कर व ग्रामसेवक इत्यादी या मीटिंगसाठी हजर होते.

## संपादकीय

# अटींना चोख उत्तर

शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची बांगलादेशची मागणी भारताने नाकारलेली नाही. पण ती भारतातील कायदेशीर चौकटीत तपासली जात असल्याचे स्पष्ट केले आहे. हा पेच हाताळताना मोदी सरकारची परिपक्वता स्पष्ट दिसून येते आहे. भारत हा कोणत्याही शेजारी राष्ट्राच्या दबावाखाली निर्णय घेणारा देश नाही.

**बांगलादेशातील पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणी तारीक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश सरकारकडून पुन्हा करण्यात आली आहे. त्यावर भारताने हा विषय कायदेशीर प्रक्रियेत असून अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित असल्याचे स्पष्ट केले आहे. हा निर्णय राजकीय किंवा राजनैतिक पातळीवर घेतला जाणार नाही तर अशा प्रकारच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवर भारताच्या न्यायव्यवस्थेकडून निर्णय घेतला जाईल असे भारतातील उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांनी बांगलादेशकडे स्पष्ट केले आहे. ऑगस्ट २०२४मध्ये ढाक्यात झालेल्या मोठ्या जनआंदोलनानंतर शेख हसीना यांना गेल्या दोन वर्षांपासून नवी दिल्लीतील एका अज्ञात ठिकाणी आश्रय आणि सुरक्षा देण्यात आली आहे. बांगलादेशात शेख हसीना यांना त्यांच्या अनुपस्थितीत मृत्यूदंडाची शिक्षा सुनावण्यात आली असून त्यांच्या अवामी लीग पक्षावरही बंदी घालण्यात आली आहे. अलीकडेच ५ ऑगस्ट रोजी शेख हसीना यांनी नवी दिल्लीतून ऑनलाइन पत्रकार परिषद घेतली होती. त्यावेळी आपण येत्या डिसेंबर महिन्यात मायदेशी परतण्याचा निर्धार केला आहे असे त्यांनी जाहीर केले. येत्या १२-१३ सप्टेंबर रोजी भारतात ब्रिक्स परिषद होणार आहे. बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांना या परिषदेसाठीचे निमंत्रण पाठवण्यात आल्यानंतर, शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाशिवाय भारतभेटीसाठी अनुकूल वातावरण तयार होणार नाही अशी भूमिका बांगलादेशने घेतली. त्यामुळे भारताला एका शेजारी राष्ट्राकडून एकप्रकारे अट घातली जात असल्याचे चित्र निर्माण झाले. तसेच तारिक रहमान भारताच्या दौऱ्यावर येणार की नाही यावरून सध्या नवी दिल्ली आणि ढाका यांच्यातील संबंधही पुन्हा चर्चेत आले आहेत. मात्र यासंदर्भातील मोदी सरकारची भूमिका कायदा, राष्ट्रीय हित आणि कूटनीती यांच्या कसोटीवर समजून घेण्याची गरज आहे. २०२४मधील आंदोलनानंतर बांगलादेशात शेख हसीना यांना त्यांच्या अनुपस्थितीत मृत्युदंड सुनावण्यात आला. हसीना यांनी आपल्यावरील संबंधित आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे म्हटले आहे. कुठल्याही देशाला भारताशी मैत्रीपूर्ण संबंध हवे असतील तर संवाद हवा. परंतु संवादाचा अर्थ राष्ट्रीय सार्वभौमत्व किंवा कायदेशीर प्रक्रिया बाजूला ठेवणे नव्हे. बांगलादेशच्या नव्या सरकारसोबतचे संबंध सुधारण्याची भारताची इच्छा आहे. पण त्यासाठी भारताने आपल्या न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा पणाला लावावी अशी अपेक्षा कुणी ठेवणे योग्य नाही. भारताने तारिक रहमान यांच्या भेटीचा दरवाजा बंद केलेला नाही. भारताकडून संवादाचे संकेतही कायम आहेत. मोदी सरकारची भूमिका संघर्ष वाढविण्याची नसून संवाद ठेवत भारताचे हित जपण्याची आहे. बांगलादेशची भूमिका अर्थातच त्यांच्या अंतर्गत राजकारणाशी जोडलेली आहे. हसीना यांचा मुद्दा तेथील राजकीय वातावरणात अत्यंत संवेदनशील बनला आहे. त्यामुळे ढाक्याने भारतभेटीलाच हसीना यांच्या प्रत्यार्पणाशी जोडणे हे देशांतर्गत राजकीय दबावाचे प्रतिबिंब असू शकते. भारताला मैत्री हवी आहे, पण दबावाखाली नाही. संवाद हवा आहे पण राष्ट्रीय हिताची किंमत मोजून नाही. या संदर्भात निर्णय होईलच. पण भारतातील कायद्याला वळसा घालून नाही. भारताचे राष्ट्रीय हित आणि कायद्याचे राज्य कायम राहिले पाहिजे.**

# चला, जलयुक्त महाराष्ट्र घडवूया!

महाराष्ट्रातील पाणीटंचाई, घटती भूजल पातळी आणि मातीची धूप यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मृद व जलसंधारण विभागाने ७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील अनेक भागांत भूजल पातळी खालावत असून पाणीटंचाईचे आव्हान निर्माण होत आहे. मोठ्या धरणांवरील अवलंबित्व कमी करून पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणावर भर देण्याची गरज शासन निर्णयात अधोरेखित करण्यात आली आहे. याच उद्देशाने माजी मुख्यमंत्री सुधाकररावजी नाईक यांनी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र जलसंधारण चळवळीचा आधार मानण्यात आला आहे. त्यांच्या जलसंधारण क्षेत्रातील योगदानाच्या स्मरणार्थ २१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

माती आणि पाणी ही परस्परांशी जोडलेली नैसर्गिक संसाधने आहेत. शेती, पर्यावरण आणि शाश्वत विकासाचा पाया असलेल्या या दोन्ही संसाधनांचे संरक्षण भविष्यातील पिढ्यांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे केवळ सरकारी यंत्रणेपुरते मर्यादित न राहता नागरिक, युवक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि विविध सामाजिक संघटनांचा सहभाग वाढविण्यावर शासनाने भर दिला आहे.



जलसंधारण दिनानिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात येणार आहे. 'Save Soil, Save Water, Secure Tomorrow' ही या उपक्रमाची थीम असून 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमाल तीन किलोमीटरचे चालण्याचे आयोजन करून मृद व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, NCC, NSS, युवा संघटना, स्वयंसेवी संस्था, खेळाडू, उद्योजक, कलाकार, सामाजिक संस्था तसेच सर्वसामान्य नागरिकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. १५ वर्षे व त्यावरील पुरुष व महिला सहभागी होऊ शकतील. जिल्हाधिकाऱ्यांवर या उपक्रमाच्या आयोजनाची प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जलसंधारण सप्ताहात युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी 'Reel for Soil and Water Conservation' ही राज्यव्यापी स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. १५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींना ३० ते ६० सेकंदांच्या Instagram Reels तयार करून माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश देण्याची संधी मिळणार आहे. मातीची धूप रोखणे, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण अशा विविध विषयांवर रील्स तयार करता येणार आहेत. या स्पर्धेत विषय व संदेश, कल्पकता, सामाजिक परिणाम, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता तसेच सोशल मीडिया सहभागाच्या आधारे गुणांकन केले जाणार आहे. जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार आणि १० हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

जलसंधारण अभियान २६ जानेवारी २०२७ पर्यंत सुरू राहणार असल्याने शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर आणि वादविवाद स्पर्धांसोबत 'एक शाळा-एक शोषखड्डा' हा उपक्रम राबविण्याची सूचना देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे आणि २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ देणे यावरही भर आहे.

अभियानाच्या कालावधीत ग्रामीण तसेच शहरी भागात जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागाची जोड देण्यात येणार आहे. मृद व जलसंधारणाच्या कामांचे भूमिपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, अमृत सरोवरांना भेट, तलाव परिसरात वृक्षारोपण, 'एक पेड माँ के नाम' अभियान आणि नाला, तलाव, विहीर व पाझर तलावांच्या स्वच्छतेसारखे उपक्रम राबविण्याचे निर्देश आहेत. शेततळी, शेतबंधारे, CCT आणि Deep CCT यांची पाहणी करण्यावरही भर देण्यात आला आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कृषी, ग्रामविकास, महसूल व वन, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता, रोजगार हमी योजना आणि शिक्षण विभागांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात विविध कार्यक्रम आयोजित करून जनजागृती करण्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे.

जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पावसाचा प्रत्येक थेंब अडवणे, भूजल पुनर्भरण करणे, मातीची धूप रोखणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या या अभियानातून जनसहभाग, युवकांची ऊर्जा आणि आधुनिक डिजिटल माध्यमांची ताकद एकत्र आल्यास जलसंधारणाची चळवळ अधिक व्यापक होऊ शकते. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' या विचारातून जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हे अभियान महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

**-अतुल पांडे,**
सहायक संचालक (माहिती)

# अभिनयाची जादू दाखवणारे उत्पल दत्त

भारतीय रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील उत्पल दत्त यांचे योगदान पूर्णपणे ओळखले गेलेले नाही. देशभरातील लोक त्यांना प्रामुख्याने त्यांच्या प्रसिद्ध हिंदी चित्रपटांमुळे ओळखतात जिथे त्यांनी बासू चॅटर्जी आणि हृषिकेश मुखर्जी आणि इतर अनेक चित्रपटांमध्ये त्यांच्या अद्वितीय विनोदी शैलीसह सुसंस्कृत पात्र रेखाटने सादर केली. जरी त्यांच्या चित्रपटांमध्ये यशस्वी मुख्य प्रवाहातील आणि मुख्य प्रवाहाबाहेरील चित्रपटांचा समावेश असला तरी, रंगभूमीचे जग त्यांना एक थिएटर अभ्यासक, लेखक, दिग्दर्शक आणि कलाकार म्हणून चांगले ओळखते. मानवांमधील आणि त्यांच्यातील अस्थिर आणि चढउतार असलेल्या संबंधांच्या अटींवर वाटाघाटी कराव्या लागणाऱ्या राजकीय नीतिमत्तेचा विचार न केल्यास रंगभूमी अर्थपूर्ण असू शकत नाही यावर त्यांनी कधीही भर दिला नाही.



दत्त यांचा जन्म २९ मार्च १९२९ रोजी झाला आणि त्यांनी कोलकाता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. रंगभूमी ही त्यांची कायमची आवड होती. त्यांनी १९४७ मध्ये 'द शेक्सपियरियन्स' या त्यांच्या गटाची स्थापना केली . त्यांचा पहिला कार्यक्रम रिचर्ड तिसरा यांचा एक शक्तिशाली निर्मिती होता, ज्यामध्ये दत्त राजाची भूमिका साकारत होते. त्यांनी प्रवासी शेक्सपियराना थिएटर कंपनीचे जेफ्री आणि लॉरा केंडल यांना इतके प्रभावित केले की त्यांनी त्यांना ताबडतोब कामावर ठेवले. त्यांनी त्यांच्यासोबत भारत आणि पाकिस्तानमध्ये दोन वर्षांचे दौरे केले, ज्यामध्ये शेक्सपियरची भूमिका साकारली, पहिले १९४७-४९ आणि नंतर १९५३-५४. ओथेलोच्या मुख्य भूमिकेतील त्यांचे पात्र इतके आश्चर्यकारक होते की अनेक वर्षांनंतर त्यांना सप्तपदी (१९६१) या प्रसिद्ध चित्रपटात उत्तम कुमार यांनी साकारलेल्या ओथेलोच्या भूमिकेसाठी आवाज देण्याची विनंती करण्यात आली होती १९ ऑगस्ट १९९३ रोजी दत्त यांचे कलकत्ता येथे निधन झाले. (साभार : इंटरनेट )



## बदलते तंत्रज्ञान

### उत्तम फोल्डेबल स्मार्टफोन गुगल पिक्सेल की सॅमसंग गॅलेक्सी?

भारतीय बाजारात प्रीमियम फोल्डेबल स्मार्टफोन्सची शर्यत रंगतदार झाली आहे. नुकताच लॉन्च झालेला गुगल पिक्सेल ११ प्रो फोल्ड आता थेट सॅमसंग गॅलेक्सी झेड फोल्ड ८ अल्ट्राशी दोन हात करत आहे. दमदार फीचर्स व प्रीमियम डिझाइनमुळे दोन्ही फोन ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. त्यामुळे नेमका कोणता स्मार्टफोन खरेदी करावा, असा प्रश्न आहे.




किंमत : गुगल पिक्सेल ११ प्रो फोल्ड एकाच व्हेरिएंटसह (१६ जीबी रॅम/१ टीबी स्टोरेज) येतो, ज्याची किंमत १ लाख ८६ हजार ९९९ रुपये इतकी आहे. तर, सॅमसंग गॅलेक्सी झेड फोल्ड ८ अल्ट्राच्या बेस व्हेरिएंटची (१२ जीबी रॅम/ २५६ जीबी स्टोरेज) किंमत १ लाख ९९ हजार ९९९ रुपयांपासून सुरू होते, तर १६ जीबी रॅम आणि १ टीबी स्टोरेज असलेल्या स्मार्टफोनची किंमत २ लाख ३९ हजार ९९९ रुपये आहे. गुगलच्या तुलनेत सॅमसंगचा फोल्डेबल स्मार्टफोन खरेदी करण्यासाठी ग्राहकांना अतिरिक्त ५३ हजार रुपये द्यावे लागतील.

डिस्प्ले : गुगल आणि सॅमसंग या दोन्ही फोल्डेबल फोन्समध्ये ८-इंचाचा मुख्य डिस्प्ले आणि ६.५ इंचाचा कव्हर डिस्प्ले देण्यात आला आहे. गुगलच्या फोनमध्ये 'Super Actua Flex OLED' डिस्प्ले आहे, जो १२०Hz रिफ्रेश रेट आणि ३६०० निट्सपर्यंतच्या पीक ब्राइटनेसला सपोर्ट करतो. दुसरीकडे, सॅमसंगच्या फोनमध्ये 'Dynamic AMOLED २X' पॅनेलचा वापर केला आहे, जो १२०Hz रिफ्रेश रेट आणि ३००० निट्सपर्यंतच्या पीक ब्राइटनेसला सपोर्ट करतो.

कॅमेरा : गुगलच्या फोल्डेबल फोनच्या मागील बाजूस ट्रिपल-कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. यात OIS सह ४८MPचा मुख्य कॅमेरा तसेच १०.५MPचा अल्ट्रा-वाइड कॅमेरा आणि १०.८MPचा टेलिफोटो कॅमेरा यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे, सॅमसंगच्या फोनमध्येही मागील बाजूस ट्रिपल-कॅमेरा सेटअप आहे. यात OISसह २००MPचा मुख्य कॅमेरा तसेच ५०MP चा अल्ट्रा-वाइड कॅमेरा आणि १०MPचा टेलिफोटो कॅमेरा देण्यात आला आहे. दोन्ही फोन्समध्ये दोन सेल्फी कॅमेरे आहेत. दोन्ही स्मार्टफोनमध्ये १०MPचा सेल्फी कॅमेरा मिळतो.

बॅटरी : गुगलच्या फोल्डेबल फोनमध्ये ४,८०६mAhची बॅटरी आहे, जी ३०W वायर्ड आणि २५W वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करते. सॅमसंगचा फोल्डेबल फोन ५००० mAh बॅटरीसह येतो आणि तो ६०W वायर्ड व २०W वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करतो.

# इंजिनीअर ते इन्फोसिसच्या सर्वेसर्वा सुधा मूर्ती



## निमित्त

भारतीय अभियांत्रिकी शिक्षिका आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील भारतातील प्रसिद्ध लेखिका सुधा मूर्ती यांनी संगणक शास्त्रज्ञ आणि अभियंता म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्या इन्फोसिस फाउंडेशनच्या अध्यक्ष आणि गेट्स फाउंडेशनच्या सार्वजनिक आरोग्य सेवा उपक्रमांच्या सदस्या आहेत. त्यांनी अनेक अनाथाश्रमांची स्थापना केली, ग्रामीण विकासाच्या प्रयत्नांमध्ये भाग घेतला आहे. कर्नाटकातील सर्व सरकारी शाळांना कॉम्प्युटर आणि ग्रंथालय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या चळवळीला पाठिंबा दिला आणि हार्वर्ड विद्यापीठात द मूर्ती क्लासिकल लायब्ररी ऑफ इंडियाची स्थापना केली.


मूर्ती यांनी कर्नाटकातील सर्व शाळांमध्ये संगणक आणि ग्रंथालय सुविधा सुरू करण्यासाठी एक धाडसी पाऊल उचलले आणि कॉम्प्युटर सायन्स शिकवले. मूर्ती या त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आणि कन्नड आणि इंग्रजी भाषेतील साहित्यातील योगदानासाठी ओळखल्या जातात. डॉलर बहू ही कादंबरी त्यांनी मूळ कन्नडमध्ये लिहिली आणि नंतर डॉलर बहू म्हणून इंग्रजीमध्ये अनुवादित केली, झी टीव्हीने २००१ मध्ये टेलिव्हिजन नाटक मालिका म्हणून रुपांतर केले. मूर्ती यांनी मराठी चित्रपट पितृरूप आणि कन्नड चित्रपट प्रेरणामध्येही काम केले आहे.

सुधा मूर्ती यांचा जन्म १९ ऑगस्ट १९५० रोजी झाला.कर्नाटकातील शिगगाव येथे सर्जन डॉ आर एच कुलकर्णी आणि त्यांची पत्नी विमला कुलकर्णी यांच्या त्या कन्या आहेत. आणि त्याच्या भावंडांचे संगोपन आई-वडील आणि आजी-आजोबांच्या घरात झाले. मूर्ती यांनी बी.व्ही.बी. कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधून (आता घडए टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी म्हणून ओळखले जाते), बी.ई. इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग पूर्ण केले. पहिला क्रमांक मिळविल्याने कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांकडून सुवर्णपदक देऊन त्यांना गौरविण्यात आले. मूर्ती यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समधून कॉम्प्युटर सायन्समध्ये एमई पूर्ण केले. तेथेही त्यांनी अव्वल स्थान पटकावले आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंगमधून सुवर्णपदक मिळवले.

सुधा मूर्तींच्या कारकिर्दीच्या सुरुवातीबद्दल बोलायचे झाले, तर भारतातील सर्वात मोठी वाहन उत्पादक कंपनी टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह कंपनी मध्ये नियुक्त केलेल्या त्या पहिल्या महिला अभियंता ठरल्या. मूर्ती पुण्यात विकास अभियंता म्हणून कंपनीत रुजू झाल्या आणि नंतर मुंबई आणि जमशेदपूरमध्ये त्यांनी काम केले. मूर्ती यांनी कंपनीच्या अध्यक्षांना पत्राद्वारे टेल्कोमध्ये फक्त पुरुष लिंगभेदाची तक्रार केली. त्यानंतर त्यांना ताबडतोब नोकरीवर घेण्यात आले.

यानंतर पुण्यातील वालचंद ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजमध्ये वरिष्ठ प्रणाली विश्लेषक म्हणून रुजू झाल्या. मूर्ती यांनी १९९६मध्ये इन्फोसिस फाऊंडेशन सुरू केले आणि आजपर्यंत इन्फोसिस फाउंडेशनचे विश्वस्त आणि बंगळुरू विद्यापीठाच्या पीजी सेंटरमध्ये व्हिजिटिंग प्रोफेसर आहेत. त्यांनी ख्रिस्त विद्यापीठातही अध्यापन अनेक पुस्तके लिहिली आणि प्रकाशित केली आहेत. (साभार इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### काळी मिरीच्या सेवनाने १००० रोग होतात बरे!

काळी मिरी सलाड, कापलेली फळं, डाळ किंवा भाज्यांमध्ये वापरली जाते. घरगुती इलाजासाठीही तिचा वापर केला जातो. काळ्या मिरीमध्ये औषधी गुण आहेत. या काळी मिरीचे कोणते रामबाण उपाय आहेत. त्यावर आज प्रकाश टाकूया...



अर्धा चमचा काळी मिरीची पावडर तुपात टाकून रोज सकाळी आणि संध्याकाळी खाल्ल्यास नजर तेज होते. दृष्टीदोष दूर होण्यास मदत होते.

काळी मिरीचे चार पाच दाणे, किशमिशचे १५ दाणे तोंडात टाकून चघळा. त्यामुळे खोकला दूर होतो. मधात काळी मिरीची पावडर टाकून तीन चार वेळा तिचं चाटण घेतल्यास खोकला थांबतो. काळी मिरी ही उत्तम अँटीऑक्सिडंट आहे. काळी मिरी अँटीबॅक्टेरिअलचं काम करते. मँगनीज आणि लोहासारख्या पोषक तत्त्वांचा तो चांगला स्त्रोत आहे. शरीराचं कार्य उत्तम ठेवण्यास त्याने मदत होते.

गॅस झाल्यावर पोट फुगल्यास काळी मिरी खा. त्यामुळे गॅसची समस्या दूर होते. काळी मिरीला सुईने छिद्र पाडा आणि ती आगीवर भाजा. त्यातून निघालेला धूर नाकाने शरीरात घ्या. हा प्रयोग केल्यास डोकेदुखी बंद होते. उचकी येणंही बंद होतं.

२० ग्रॅम काळी मिरी , जिरे १० ग्रॅम आणि साखर १५ ग्रॅम घेऊन त्याचं मिश्रण करा. त्यानंतर ते पाण्यात टाकून सकाळी संध्याकाळी घ्या. मूळव्याधापासून राम मिळेल.

पांढरी मिरी डोळे आणि कपाळासाठी उपयुक्त मानली जाते. पीठात देशी तूप घाला. त्यात थोडी साखर टाकून सफेद काळी मिरी पावडर टाका. आणि त्याचं सकाळी तसेच संध्याकाळी सेवन करा. त्वचेवर फोडं आले असतील तर काळी मिरीवर थोडं पाणी टाकून ती दगडावर घासा. त्यानंतर करंगळी बाजूच्या बोटाने फोडीवर ते मलम लावा, त्यामुळे फोडी गायब होते.

तुमचा रक्तदाब कमी होत असेल तर दिवसातून दोन तीन वेळा पाच दाने काळी मिरी आणि किशमिशचे २१ दाणे खा. काळी मिरी, हिंग, कापूर (सर्व पाच पाच ग्रॅम) यांचं मिश्रण बनवा. त्यानंतर राई एवढ्या गोळ्या बनवा. प्रत्येक तीन तासानंतर एक गोळी खाल्ल्यावर उलटी, दस्त बंद होतील.

सर्दी झाल्यावर काळी मिरीचे चार पाच दाणे वाटून एक कप दूधात गरम करून प्या. सकाळ संध्याकाळी हे दूध प्यायल्यास आराम मिळतो. काळ्या मिरीचा चहा घेतल्यावर सर्दी पडसे, खोकला आणि व्हायरल इन्फेक्शनपासून आराम मिळतो. काळी मिरीमुळे पाचन क्रियाही सुधारते.

# श्रीवर्धनमध्ये मासळीची आवक वाढली



## श्रावण महिन्यामुळे खवय्यांची पंचाईत

**श्रीवर्धन : बातमीदार**

मागील दहा ते पंधरा दिवसांपासून श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याच्या जवळच लहान होड्यांमधून मच्छीमारांनी मच्छीमारी सुरू केली आहे. समुद्राचे पाणी थोडे शांत झाले असल्यामुळे सध्या मच्छीमारी करण्यासाठी चांगली वेळ आहे. खोल समुद्रात मच्छीमारी करण्यासाठीची बंदी १५ ऑगस्ट रोजी उठली असली तरीही, नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला नारळ अर्पण केल्यानंतरच मच्छीमार बांधव खोल समुद्रातील मच्छीमारी चालू करतील. सध्या समुद्रकिनाऱ्याच्या जवळच मुबलक प्रमाणात मच्छी सापडत आहे.

यामध्ये खास करून कोळंबी, बोंबील, ढोमा, मांदेली, बिलिज, बोईट इत्यादी मच्छी बाजारामध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध होत आहे. त्याचप्रमाणे पापलेटदेखील चांगल्या प्रमाणात उपलब्ध आहेत. मच्छीची आवक बाजारामध्ये वाढलेली असली तरीही मच्छीचे भाव मात्र गगनाला भिडलेले आहेत. दरवेळेला ९०० ते ८०० रुपये किलो असलेले पापलेट या वेळेला बाराशे रुपये किलोनी विकले जात आहे. तर तीनशे ते साडेतीनशे रुपयांना मिळणारी कोळंबी ही ४००, ४५० व ५००च्या भावानी साईज प्रमाणे विकली जात आहे. डिझेलचे वाढलेले दर, होड्यांना लागणारा दुरुस्तीसाठीचा खर्च, त्याचप्रमाणे खलाशांची मजुरी या सर्वांमध्ये वाढ झाल्यामुळे मच्छीचे भाव वाढले असल्याचे बोलले जात आहे.

या वर्षाची पावसाची सरासरी कमी असल्यामुळे व पाऊस देखील कमी पडत असल्यामुळे शनिवारी, रविवारी व इतर सुट्टीच्या दिवशी पर्यटक तुरळक प्रमाणात श्रीवर्धन मध्ये येत आहेत. परंतु खऱ्या अर्थाने पर्यटकांचा हंगाम सुरू होईल तो १० दिवसाचे गणपती विसर्जन झाल्यानंतरच. बाजारात मच्छीची आवक खूप मोठ्या प्रमाणात वाढली असली तरीही, श्रावण महिना सुरू झाल्यामुळे अनेक खवय्यांमधून याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

# वावे-बेंडसे पुलाची दयनीय स्थिती

## रेलिंग वाहून गेल्याने अपघाताला निमंत्रण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीवरील वावे आणि बेंडसे गावांना जोडणारा पूल आहे. या पुलाच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षा रक्षक म्हणून असलेल्या लोखंडी रेलिंग तुटून तर काही महापुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. वावे-बेंडसे पुलावरील तुटलेले रेलिंग अपघाताला निमंत्रण देणाऱ्या असून सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देईल का? असा सवाल उपस्थित होत आहे.

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवरील वावे-बेंडसे पुलावरील संरक्षक रेलिंग तुटलेल्या अवस्थेत असल्याने वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थ यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असताना रेलिंग अनेक ठिकाणी तुटलेले व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येत आहे.

पुलाच्या बाजूला नदीचे पात्र असून तुटलेल्या रेलिंगमुळे वाहन चालकांचे तसेच पादचाऱ्यांचे



जीव धोक्यात आले आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी अथवा मुसळधार पावसात वाहन अनियंत्रित झाल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या पुलाचा वापर वावे, बेंडसे, पोसरी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे पुलावरील तुटलेले रेलिंग तातडीने दुरुस्त करून मजबूत संरक्षक कठडे बसविण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

# रेपोली येथे महामार्गावर स्पीड ब्रेकरची मागणी



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मौजे रेपोली येथून जाणाऱ्या मुंबईगोवा राष्ट्रीय महामार्गावर स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी जोर धरू लागली आहे. या ठिकाणी वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच नागरिकांना रस्ता ओलांडताना अडचणी निर्माण होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने तातडीने उपाययोजना करून स्पीड ब्रेकर बसवावा, अशी मागणी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे करण्यात आली आहे.

यासंदर्भात माणगाव तालुक्यातील नागरिकांनी खासदार सुनील तटकरे यांना निवेदन देऊन रेपोली परिसरातील वाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न त्यांच्या निदर्शनास आणून दिला आहे.

राष्ट्रीय महामार्गावरून दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात अवजड तसेच वेगवान वाहतूक सुरू असते. त्यामुळे स्थानिक नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच पादचाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठा धोका निर्माण होतो.

विशेषतः परिसरातील नागरिकांची ये-जा लक्षात घेता या ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी योग्य त्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. स्पीड ब्रेकर नसल्यामुळे भरधाव वाहने या परिसरातून वेगाने जातात. त्यामुळे एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# कंत्राटी कामगारांच्या वेतनवाढीसाठी भारतीय मजदूर संघाचे अलिबागमध्ये आंदोलन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महागाई आणि अस्थिर रोजगाराच्या पार्श्वभूमीवर कंत्राटी व औद्योगिक कामगारांच्या किमान वेतनात भरीव वाढ करण्याच्या मागणीसाठी भारतीय मजदूर संघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने १७ ऑगस्ट रोजी राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. रायगड जिल्ह्यातील हे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे पार पडले.

सध्या कंत्राटी कामगारांना सुमारे ₹१५,००० प्रतिमहिना किमान वेतन मिळत असून ते अपुरे असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. त्यामुळे हे वेतन ₹१५,००० वरून ₹३०,००० प्रतिमहिना करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. कंत्राटी कामगार कायमस्वरूपी कामगारांप्रमाणेच दीर्घकाळ व नियमित काम करीत असल्याने त्यांना ₹३०,००० प्रतिमहिना किमान वेतन मिळावे, तसेच कंत्राटदारांकडून होणारे शोषण थांबवण्यासाठी शासनाने कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय ESIC आणि EPF नियमांची पारदर्शक अंमलबजावणी व्हावी आणि सामाजिक सुरक्षा योजनांच्या नावाखाली कामगारांच्या हक्कांवर परिणाम होऊ नये, अशी ठाम भूमिका मांडण्यात आली. तसेच कामगार संहिता (Labour Codes) मधील कामगारहितास बाधक त्रुटी व पळवाटा दूर करून न्याय्य वेतन, सामाजिक सुरक्षा आणि रोजगार संरक्षणासाठी तातडीने सुधारणा करण्याची मागणीही आंदोलनातून करण्यात आली.

या आंदोलनात अनिल धुमणे राष्ट्रीय सचिव, भारतीय मजदूर संघ सुरेश पाटील महासचिव, भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघ, सुधीर घरत राष्ट्रीय कोषाध्यक्ष भारतीय पोर्ट व डॉक मजदूर महासंघ यांच्यासह मोठ्या संख्येने कामगार व पदाधिकारी उपस्थित होत. आंदोलनादरम्यान कामगारांच्या वेतन, भत्ते आणि सामाजिक सुरक्षेसाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर


**पनवेल महानगरपालिका**
तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२०६
**महिला व बाल कल्याण विभाग**
**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेतर्फे एकल महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांची अद्ययावत माहिती संकलित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने नगर विकास विभागाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील एकल महिलांचे सर्वेक्षण व नोंदणी करण्यात येत आहे.

**सदर सर्वेक्षणामध्ये विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसेच प्रौढ कुमारीका** यांचा समावेश करण्यात येणार आहे. एकल महिलांनी त्यांची माहिती उपलब्ध करून देऊन सर्वेक्षण व नोंदणी प्रक्रियेत सहभागी व्हावे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पात्र एकल महिलांनी दिनांक **२५ ऑगस्ट २०२६ रोजीपर्यंत** पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या **ऑनलाईन सर्वेक्षण/ नोंदणी फॉर्मद्वारे आपली माहिती नोंदवावी.** तसेच संबंधित प्रभाग/महापालिका कार्यालयामार्फतही नोंदणी करता येईल.

महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या नमुना अर्ज/ फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरून तो महिला व बालकल्याण विभागाकडे अथवा samup.pmc@gmail.com या ई-मेल आयडीवर दि. २८/०८/२०२६ पर्यंत पाठवावा.

पमपा/मबाक/जा.क्र.८७/२०२६
दिनांक :- १८/०८/२०२६

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
पनवेल महानगरपालिका


# पाली-भुतिवली धरण परिसरात ५० रोपांची मुंबईकर पर्यावरणप्रेमींकडून लागवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील भिवपुरी रोड येथील पाली भुतिवली धरण परिसरात पर्यावरण संदेश देत वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात परिसरातील रहिवाशी आणि पर्यावरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेत सुमारे ५० झाडांची लागवड केली.

पाली- भूतीवली लघुपाटबंधारे प्रकल्प परिसरातील निसर्गसौंदर्य आणि जैवविविधता टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पावसाळ्यातील अनुकूल वातावरणाचा फायदा घेत विविध रोपांची लागवड करण्यात आली. यावेळी सहभागी झालेल्यांनी रोपांची योग्य निगा राखण्याचा संकल्पही केला. विलास वैद्य, ममता वैद्य , समीर जोशी, हेमंत पाठक, अमृता पाठक, विजय रायकर, सारंग मुळे, मनीष विश्वकर्मा, नयना आघारकर, अश्विनी कारंडे, नम्रता विश्वकर्मा, धनश्री वैद्य, कृपाली पांड्या, अर्पिता खानविलकर, गंधार खानविलकर , सुरेश देवकर, निखिल



गायकर, रवी जाधव आदींनी पाली भुतिवली धरण परिसरात वृक्षारोपण केले

या उपक्रमाचे पर्यावरणप्रेमी आणि स्थानिकानी कौतुक होत आहे. वृक्षारोपणामुळे परिसराचे हरित क्षेत्र वाढण्यासोबतच मातीची धूप रोखणे, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी निसर्गसंपदा जपण्यास मदत होणार आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' या संदेशातून पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन करण्यात आले.

# तळाघर तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी रूपेश शिंदे

**धाटाव : प्रतिनिधी**

ग्रामपंचायत तळाघर अंतर्गत तंटामुक्त समितीची नूतन कार्यकारिणी नुकतीच बिनविरोध निवडण्यात आली. या निवडीत रुपेश शिंदे यांची तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असून, त्यांच्या निवडीचे ग्रामस्थ, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

तंटामुक्त समितीच्या उपाध्यक्षपदी ज्ञानदेव सुटे, सचिवपदी प्रकाश शिर्के, तर सदस्य म्हणून गजानन मोडे, गणेश दे. मोरे आणि विठोबा भगत यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संपूर्ण कार्यकारिणीची निवड एकमताने झाल्याने गावातील सामाजिक एकोपा आणि सलोख्याचे दर्शन या निवडीतून घडले आहे. अध्यक्षपदी निवड झालेले रुपेश शिंदे हे तळाघर गावातील कला, क्रीडा, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अग्रस्थानी सक्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित आहेत.


**रोहा नगर परिषद**
ता. रोहा, जिल्हा रायगड
पिन कोड - ४०२१०९.
email : rohanagarpalika@gmail.com

क्र. रोनप/बांवि/ ई-निविदा सुचना/१४१६/२०२६ दिनांक :- १८/०८/२०२६

**जाहीर ई-निविदा सूचना**

रोहा नगर परिषदेच्या विविध विकास कामांसाठी स्थापत्य सल्लागार (civil & Infrastructure work consultant) यांचे पॅनल तयार करणे. या कामाची ई-निविदा सूचना शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक १९-०८-२०२६ रोजी ऑनलाईन प्रसिद्ध करणेत आलेली आहे. याबाबतची सविस्तर व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

**सही/-** **(अजयकुमार एडके)** मुख्याधिकारी, रोहा अष्टमी नगर परिषद
**सही/-** **(वनश्री अवनी समीर शेडगे)** नगराध्यक्षा, रोहा अष्टमी नगर परिषद



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे वारदोली,** तहसील-पनवेल, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार **श्री. शाम अनंत मोरे व इतर,** यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे वारदोली,** तहसील पनवेल, जिल्हा रायगड येथील जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पनवेल मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १०५/१ | २ | ०-३२-४० | ०-०२-३० | ०-३४-७० | २.०० |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०८/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.
(खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपक :- ८८८८२७१७५९



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे मोहो, ता.पनवेल, जि. रायगड येथील **नितिन नामा शेळके व इतर ३** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे मोहो, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| मनिषा गणेश निंबाळकर<br>नितिन नामा शेळके<br>बेबी नामा शेळके<br>महेश नामा शेळके | ४५ | ५ | ०.१६.००<br>अविभाज्य हिश्यापैकी खरेदी क्षेत्र ०.०८.०० हे.आर.चौ.मी. | १४.५६ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम. ओ. यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी / नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०८/२०२६

**सही /-**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email : vijaybhagat43@gmail.com


# कर्जत रेल्वेस्थानकात सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

**कर्जत : वार्ताहर**

कर्जत रेल्वेस्थानक हे मध्य रेल्वेचे अत्यंत महत्त्वाचे दुहेरी जंक्शन आहे. येथून कर्जत-खोपोली तसेच कर्जत-पनवेल हे रेल्वेमार्ग जोडलेले आहेत. पुणे, कोकण, पनवेल, मुंबई तसेच कल्याण या दिशेने ये-जा करणाऱ्या अनेक मेल व एक्स्प्रेस गाड्याही या मार्गावरून जातात. त्यामुळे सर्व प्रमुख मेल व एक्स्प्रेस गाड्यांना कर्जत रेल्वेस्थानकावर नियमित व अधिकृत थांबा देण्यात यावा, अशी मागणी अरुण गांगल यांनी केली आहे.




याशिवाय कर्जत आरक्षण केंद्रातून सर्व मेल व एक्स्प्रेस गाड्यांचे आरक्षण तसेच तिकीट उपलब्ध करून देण्यात यावे. देशातील कोणत्याही भागासाठी ब्रेक जर्नी उदाहरणार्थ लखनऊ मुंबई ट्रेनला कल्याणला उतरल्यावर कल्याणहून युनिट लोकलने कर्जतला यायला मिळावे सुविधेसह तिकीट उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

ज्येष्ठ नागरिकांना पूर्वीप्रमाणे रेल्वे प्रवास भाड्यात सवलत पुन्हा सुरू करण्यात यावी. मेल व एक्स्प्रेस गाड्यांमध्येही लोकल गाड्यांप्रमाणे पुढील स्थानकाची माहिती हिंदी, मराठी/स्थानिक राज्यभाषा आणि इंग्रजी या तीनही भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात यावी. प्रत्येक प्लॅटफॉर्मच्या मध्यभागी स्वच्छ व पुरेशा क्षमतेची स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात यावी. प्रत्येक रेल्वे डब्यात योग्य वायुविजनासाठी एक्झॉस्ट फॅनची व्यवस्था करण्यात यावी, असे गांगल यांनी म्हटले आहे.

पूर्वीप्रमाणे कर्जत-सीएसएमटी कर्जत-पुणे मेल/एक्स्प्रेस पास सुविधा पुन्हा सुरू करण्यात यावी. सर्व मेल एक्सप्रेस गाड्यांना त्या पासने प्रवास करण्याची परवानगी असावी. कर्जत-पनवेल रेल्वेमार्गाला कोकण रेल्वेशी अधिक प्रभावीपणे जोडण्यासाठी चिखले ते सोमाटणे स्थानकांदरम्यान रेल्वे बायपासचा प्रस्ताव अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. भविष्यातील रेल्वे वाहतूक व विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

# विविध प्रलंबित विकासकामे आणि नागरिकांच्या प्रश्नांबाबत आमदार मंदा म्हात्रे यांची आयुक्तांशी चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील विविध विकासकामे, नागरिकांच्या प्रलंबित मागण्या तसेच महानगरपालिका प्रशासनाशी संबंधित महत्त्वाच्या विषयांवर आज आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, सर्व विभागांचे अधिकारी, सर्व प्रभागांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली.सदर बैठकीत चर्चा झालेल्या सर्व मागण्या आयुक्तांनी मान्य केल्या असून पुढील ८ दिवसात उत्तर देण्याचे निर्देश आयुक्तांनी सर्व उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिक, मंडळे आणि संबंधित संस्थांना आवश्यक परवानग्या मिळण्यासाठी 'एक खिडकी योजना' प्रभावीपणे राबविण्याची मागणी केली. तसेच सीबीडी–बेलापूर येथील महानगरपालिकेच्या गाळ्यांबाबत चौकशी करून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.



मतदारसंघातील पूर्ण झालेल्या विविध वास्तूंचे लवकरात लवकर लोकार्पण करून त्या नागरिकांसाठी खुल्या करणे, तसेच त्यांची नियमित देखभाल व स्वच्छता राखण्याबाबतही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. नेरूळ (पश्चिम), नेताजी सुभाषचंद्र बोस उद्यान, सेक्टर ४ येथील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र तातडीने खुले करून ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

दिवाळेगावातील विकासकामांना प्राधान्य दिवाळेगाव येथील व्यायामशाळेचे काम पूर्ण करून ती नागरिकांच्या वापरासाठी उपलब्ध करून देणे.समाज मंदिराचे काम मंजूर करून तातडीने बांधकाम सुरू करणे.नागरिक व रिक्षाचालकांच्या सोयीसाठी रिक्षा स्टँड/निवारा शेडचे आवश्यक काम तातडीने पूर्ण करणे.

बेलापूर विधानसभा मतदारसंघातील स्मशानभूमींचे सुशोभीकरण व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवून वाहतूक सुरळीत करण्याबाबत प्रशासनाला सूचना करण्यात आल्या.तसेच 'नैवेद्य' आणि 'अलबेला' या इमारती न तोडता त्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.सानपाडा येथील सेंट्रल लायब्ररीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.तसेच दिवाळेगाव येथे उभारण्यात आलेल्या संगणक प्रशिक्षण केंद्र व ग्रंथालय इमारतीला माजी नगरसेवक कै. जगन्नाथ धर्मा कोळी यांचे नाव देण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी आमदारांनी केली.

शहरातील सर्व होर्डिंग्ज लावताना संबंधित महानगरपालिका प्रशासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असून, परवानगीशिवाय लावण्यात आलेल्या होर्डिंग्जवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले.तसेच परिवहन सेवेत असलेल्या बसेस वर लावण्यात येणाऱ्या जाहिरातीबाबत देखील योग्यती परवानगी घेऊनच जाहिरात करू देणे.या बैठकीस आमदार मंदा म्हात्रे यांच्यासह नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, सर्व विभागांचे अधिकारी, सर्व प्रभागांचे अधिकारी, पत्रकार, कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रमिक शिक्षण संस्थेच्या माध्यमातून अमली पदार्थविरोधी जनजागृती व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रमिक शिक्षण संस्थेच्या एफ.जी. नाईक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व रा.फ. नाईक कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १८ ऑगस्ट रोजी नशा मुक्त भारत अभियाना अंतर्गत अमली पदार्थ विरोधी जनजागृती संदर्भात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. वाढत्या व्यसनाधीनतेविरुद्ध जनजागृती करणे हा या व्याख्यानाचा मुख्य उद्देश होता.

अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स कोपरखैरणे, नवी मुंबई युनिटचे पोलीस उप निरीक्षक सुहास तावडे व त्यांचा सहकारी स्टाफ आणि श्रमिक शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक संचालिका अमिता पंडित भट, प्राचार्य प्रताप महाडिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य रवींद्र पाटील, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सदर कार्यक्रमात उपस्थित होते.



पोलीस उप निरीक्षक सुहास तावडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना असे सांगितले की आपण सर्वांनी एकत्र येऊन नशा मुक्त भारत सशक्त भारत बनविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे तसेच त्यांनी आजची तरुण पिढी अंमली पदार्थांच्या आहारी जात आहे ही चिंतेची बाब आहे. निरोगी समाजासाठी प्रत्येकाने व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे त्यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थ व त्याचे प्रकार, व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम तसेच व्यसनामुळे व्यक्तीचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होते, कुटुंबाची वाताहत होते. तसेच समाजाची हानी होऊन देशाच्या भवितव्याचे मोठे नुकसान होते. अमली पदार्थांचे सेवन केवळ शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडवत नाही, तर व्यसनाधीनतेतून गुन्हेगारीकडे वाटचाल होण्याची शक्यता वाढते.

त्यामुळे अमली पदार्थांच्या सेवनापासून सर्वांनीच दूर राहून उच्च शिक्षणाची कास धरावी, जीवनामध्ये येणारे ताण तणाव कमी करण्यासाठी काहीजण अमली पदार्थाकडे वळत असतात त्यासाठी आपण आपल्याला जीवनाचा मार्ग दाखवणाऱ्या व्यक्ती म्हणजेच आपले आई–वडील व शिक्षक यांच्याशी संवाद साधावा, आपण असं काही जीवनामध्ये करा की त्यामुळे आपल्या आई–वडिलांची प्रतिष्ठा वाढेल जिम व योगा करावा, तसेच अभ्यासाची नशा करायला शिका असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले

नशेला नाही म्हणायला शिका व समाजामध्ये चांगले अधिकारी बनून समाजाची सेवा करा असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी नशा न करण्याची सामूहिक शपथ घेतली. सदर व्याख्यानात एकूण १३८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# वाईन शॉपचे शटर फोडून घरफोडी करणारा आरोपी ताब्यात

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत डिंपल वाईन शॉपचे शटर तोडून मोबाईल व रोख रक्कम चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने शिताफीने ताब्यात घेतले आहे.

दि. ६ ऑगस्ट रोजी. अज्ञात इसमाने रात्रीच्या वेळी डिंपल वाईन शॉपचे शटर तोडून सॅमसंग कंपनीचा एक मोबाईल आणि ५५ हजार रुपये रोख असा मुद्देमाल चोरी करून नेला होता. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्ह्याचा समांतर तपास करताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पथकाने रसायनी तसेच आसपासच्या जिल्ह्यांमधील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयित आरोपीचा माग काढण्यास सुरुवात केली.



दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस हवालदार प्रतीक सावंत यांना सदर गुन्ह्यातील संशयित आरोपी कर्जत येथे घरफोडी करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे तपास पथकाने सापळा रचून संशयित आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव रामनिवास मंजु गुप्ता (वय ३८ वर्षे) असून तो रौनक सिटी, सेक्टर ०४, आधारवाडी, कल्याण (पश्चिम), ठाणे येथे राहतो. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.सदर कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. मानसिंग पाटील, सहा. फौजदार संदीप पाटील, पोहवा. सुधीर मोरे, रवी मुंडे, प्रतीक सावंत, शरद फरांदे, रणजितसिंह खराडे, मनोहर सिरतार, पोशि. प्रदीप खरात आणि पोहवा. तुषार घरत (सायबर) यांच्या पथकाने केली.

# पोलीस नाईक अनिल सूर्यवंशी यांना कॉप ऑफ द मंथ पुरस्कार जाहीर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालय (सीबीडी विभाग) कडून एनआरआय सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस नाईक अनिल सूर्यवंशी (बकल नं. २३६१) यांना त्यांच्या उत्कृष्ट आणि सामाजिक बांधिलकी जपेलेल्या कामगिरीबद्दल 'कॉप ऑफ द मंथ' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पोलीस नाईक अनिल सूर्यवंशी यांनी एका मानसिक रुग्ण असलेल्या बेघर इसमाला ताब्यात घेऊन त्याला नेरे (ता. पनवेल) येथील बेघर इसमांच्या आश्रमात सुरक्षितपणे दाखल केले. तसेच, त्यांच्यावर योग्य वैद्यकीय उपचार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या तत्पर आणि संवेदनशील कामगिरीची दखल घेऊन जुलाई २०२६ या महिन्यासाठी त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सहाय्यक पोलीस आयुक्त मयुर भुजबळ यांनी सूर्यवंशी यांच्या या उल्लेखनीय कामाचे कौतुक करत त्यांना प्रशंसापत्र देऊन अभिनंदन केले आणि भविष्यातही अशीच उत्तम कामगिरी



पार पाडाल असा विश्वास व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

पोलीस कर्मचाऱ्यांच्या अशा संवेदनशील आणि उल्लेखनीय कामगिरीमुळे पोलीस दलाची प्रतिमा अधिक उज्ज्वल होण्यास मदत होत असून, इतर कर्मचाऱ्यांनाही यामुळे कामासाठी नवे बळ मिळत आहे.

# सिडको जमिनींवर अनधिकृत डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको महामंडळाच्या अखत्यारीतील संपादित तसेच संपादित होत असलेल्या मोकळ्या भूखंडांवर अनधिकृतपणे धोकादायक डेब्रिज (राडा–रोडा) टाकणाऱ्यांवर सिडको प्रशासन आणि नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाईचा बडगा उगारला आहे. १२ ऑगस्ट रोजी केलेल्या या धडक मोहिमेदरम्यान अनधिकृत डेब्रिज वाहतूक करणारे दोन डंपर ताब्यात घेऊन चालकांवर वाशी आणि कोपरखैरणे पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

मुख्य दक्षता अधिकारी (सिडको) आणि नवी मुंबई वाहतूक पोलीस उपआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोचे अभियांत्रिकी विभाग, सुरक्षा रक्षक, दक्षता तपास अधिकारी आणि वाहतूक पोलिसांच्या पथकाने ही संयुक्त मोहीम राबवली. मोकळ्या भूखंडांवर अनधिकृतपणे टाकला जाणारा हा राडा–रोडा मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास अत्यंत हानीकारक असल्याचे निदर्शनास आल्याने ही तीव्र कारवाई करण्यात आली.

वाशी टोलनाक्याजवळ कारवाई: १२ ऑगस्ट रोजी दुपारी १:०० वाजण्याच्या सुमारास डंपर चालक राकेश यादव हा वडाळा येथून आणलेले डेब्रिज सिडकोच्या मोकळ्या जागेत टाकण्यासाठी जात असताना वाशी टोलनाक्याजवळ पथकाने त्याला पकडले. याप्रकरणी सिडकोच्या सहाय्यक अभियंता शामली विसपुते–दुबे यांच्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोपरखैरणे येथे दुसरी कारवाई: त्याच दिवशी सायंकाळी ४:३० वाजण्याच्या सुमारास कोपरखैरणे डी–मार्ट जवळ डंपर चालक सोमनाथ घनश्याम ससाणे याला अनधिकृतपणे डेब्रिज भरून वाहतूक करताना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी सिडकोचे कार्यकारी अभियंता अश्वजित बनसोड यांच्या तक्रारीवरून कोपरखैरणे पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलमांनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सिडको प्रशासनाचे नागरिकांना आवाहनः सिडको परिक्षेत्रात किंवा मोकळ्या भूखंडांवर कोणीही अनधिकृतपणे डेब्रिज टाकत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तात्काळ सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा संबंधित पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# फुंडे महाविद्यालयात एचआयव्ही एड्स जागृती

**उरण : प्रतिनिधी**

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अलिबाग आणि ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने "इंटिसिफाईड आय ई सी कॅम्पेन" अभियाना अंतर्गत तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनी यांना किशोरवयीन वयात होणारे मानसिक आजार तसेच शारीरिक बदल , जीवन शैलीबद्दल आणि मानसिक आरोग्य व आहार आणि आपल्या आरोग्य चांगले कसे राहील याबद्दल मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर एड्स होण्याची कारणे व त्यावरील उपचारांची माहिती देण्यात आली. मादक पदार्थांचा दुरुपयोग न्यूट्रिशन योगा इत्यादी विषयावर व एच आय व्ही एड्स प्रतिबंधक कायदा २०१७ याबाबत सुद्धा माहिती देण्यात आली.सदर मार्गदर्शन आयसीटीसी समुपदेशक महादेव पवार यांनी केले,सदर कार्यक्रमाला १०५ विद्यार्थी उपस्थित होते , या कार्यक्रमात शाळेच्या पर्यवेक्षिका एस. एस. पाटील, उप शिक्षक एस. डी. नाईक, उपशिक्षिका डी. जी. पाटील, उपस्थित होते.

# कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी एकल महिलांना नोंदणी करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२६ / प्र.क्र.६३ / का.०३, दि. २२ मे, २०२६ अन्वये 'एकल महिला धोरणासाठी मसुदा समिती गठीत करणेबाबत' शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेविषयक, आरोग्यविषयक व पुनर्वसनाच्या प्रश्नांचा सर्वकष विचार करणे आवश्यक आहे. या महिलांना विविध विभागांच्या योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देणे आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी उपाययोजना करण्याच्या उद्देशाने एकल महिलांच्या कल्याणासाठी सुयोग्य धोरण आणले जात आहे.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिला ज्यामध्ये (१) विधवा पतीचे निधन झालेल्या महिला, (२) घटस्फोटित पतीपासून कायदेशीररित्या विभक्त झालेल्या महिला, (३) परित्यक्ता पतीकडून सोडचिठ्ठी न देता किंवा बेवारस सोडलेल्या (त्याग केलेल्या) महिला, (४) अविवाहीत लग्न न केलेल्या व वयाने मोठ्या असणाऱ्या एकट्या महिला, (५) दिव्यांग किंवा इतर शारिरीकदृष्ट्या अपंग किंवा संकटात एकट्या जीवन जगणाऱ्या महिला यांचा समावेश होतो.

अशा एकल महिलांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या जवळच्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयामध्ये जाऊन एकल महिला असल्याबाबत नोंदणी करावी. नोंदणीकरीता अंतिम दिनांक २५ ऑगस्ट, २०२६ हा असून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांनी या नियोजित लोककल्याणकारी धोरणांतर्गत योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

# नवी मुंबईच्या पर्यावरण संवर्धनासाठी हरित विभाग स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा अभियानामध्ये नवी मुंबई महानगरपालिका राज्यातील व्दितीय क्रमांकाचे मानांकित पर्यावरणशील शहर आहे. या अनुषंगाने शहरामध्ये लोकसहभागातून पर्यावरण जतन व संवर्धनाची चळवळ उभी रहावी यादृष्टीने 'हरित विभाग स्पर्धा ' आयोजित करण्यात येत असल्याचे महापौर सुजाता पाटील यांनी नुकतेच कोपरखैरणे येथील निसर्गेद्यानात झालेल्या वृक्षारोपण समारंभप्रसंगी जाहीर केले होते.

त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी परिपत्रक जारी केले असून हरित विभाग स्पर्धेमध्ये पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, ट्री बेल्ट, रस्ता दुभाजक व चौक नीटनेटके ठेवण्यासाठी व रहिवास क्षेत्राभोवतालच्या परिसरातील हिरवळ वाढवून नवी मुंबईला स्वच्छ व हरित शहर म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी पर्यावरण रक्षक व संवर्धक अशी विभागनिहाय 'हरित विभाग स्पर्धा' आयोजित करण्यात येत आहे.

उद्यानांची जोपासना करीत असताना नाविन्यपूर्ण संकल्पना राबवून शहरातील हरित आच्छादन वाढवावे व नवी मुंबई परिसरात ज्या ठिकाणी सुशोभिकरण करण्यास वाव आहे अशा ठिकाणी अत्याधुनिक स्वरूपात सुशोभिकरण करण्याचे उद्दिष्ट साकारण्यासाठी या हरित विभाग स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

आपल्या परिसराचा स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक विकास करण्याच्या उद्देशाने नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या हरित विभाग स्पर्धेमध्ये खालील बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे. या स्पर्धेचा कालावधी ऑगस्ट २०२६ ते मार्च २०२७ पर्यंत राहील. सदर कालावधीत विभाग स्तर अधिकारी तथा वृक्ष अधिकारी यांचे नियंत्रण व मार्गदर्शनाखाली विभाग जास्तीत जास्त हरित व सुशोभित होईल यादृष्टीने कामकाज अपेक्षिलेले आहे. त्या अनुषंगाने विभाग अधिकारी तथा वृक्ष अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून अंमलबजावणी करून घ्यावयाची आहे. या अंतर्गत नागरिकांमध्ये पर्यावरणविषयक जाणीव जागृती करून व्यापक लोकसहभागातून विविध उपक्रम राबवावयाचे आहेत.

**स्पर्धेकरिता नमुंमपा उद्यान विभागाच्या वतीने स्पर्धेचे निकष जारी करण्यात आले आहेत.**

१. नावीन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित उद्यानाचे सुशोभिकरण करणे.२. प्रदूषण नियंत्रणासाठी देशी व वनस्पतीजन्य वृक्ष प्रजातीची लागवड३. उद्याने, रस्ते व मोकळ्या जागांचे सुशोभीकरण४. जैवविविधता जोपासण्यासाठी केलेले वनीकरण५. पर्यटनास उपयुक्त उद्यान६. रोपवाटिकेत लागवड केलेली विशेष फुलझाडे व फळझाडे ७. शालेय विद्यार्थ्यांचा समावेश करून वृक्ष संवर्धन व जोपासना संबधित उपक्रम राबविणे.८. सीएसआरच्या माध्यमातून हरित क्षेत्र वाढीस उपयुक्त असे विविध उपक्रम हाती घेणे.९. महानगरपालिकेमार्फत सुरू असलेले उद्यान देखभाल व संवर्धनाच्या दैनंदिन कामकाजाचे पर्यवेक्षण.१०. उद्यान विभागात प्राप्त होणाऱ्या ऑनलाईन तक्रारींचा जलद निपटारा करणे.११. खाजगी तसेच सार्वजनिक विकास प्रकल्पामध्ये बाधीत होत असणाऱ्या वृक्षांपैकी जास्तीत जास्त वृक्ष वाचविण्याच्या दृष्टीने वृक्ष स्थलांतर करणे व स्थलांतरित वृक्षाचे संवर्धन करण्याकरिता उपाययोजना करणे.१२. वृक्ष दिंडी कार्यक्रम, बीज संकलन, हरित कचऱ्यापासून खत निर्मिती, झाडांच्या शुष्क अवशेषापासून सुशोभिकरण इ. माध्यमांतून जनजागृती कार्यक्रम राबविणे.१३. पुरातन वृक्षांची जोपासना करणे.१४. आपण केलेल्या नाविन्यपूर्ण कामाचा पूर्वीचा फोटो व केल्यानंतरचा फोटो आवश्यक राहील.

या हरित विभाग स्पर्धेत, नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व ८ विभाग कार्यालयांचा समावेश असेल व आपला विभाग हरित व आदर्श बनवण्यासाठी सर्व साधनांचा वापर करुन या स्पर्धेचे नियोजन करावे असे प्रस्तावित आहे.सदर स्पर्धेचा कालावधी ३१ मार्च २०२७ पर्यंत राहील.

या कामाचे मूल्यमापन पारदर्शक व्हावे यादृष्टीने उपआयुक्त (उद्यान) यांच्या अध्यक्षतेखाली नामांकित पर्यावरण संस्था / स्वयंसेवी संस्था यांच्या पर्यवेक्षण नियंत्रण समितीकडून अंतिम परीक्षण केले जाईल.




## नवचैतन्याचा पाऊस

कोमजल्या धरेवर, वर्षाव झाला पर्जन्याचा,
मृदेच्या कुशीतून दरवळला, सुगंध जसा कस्तुरीचा ॥धृ.॥
दिसं कोरडे सरले, तिमिर आच्छादला,
पांघरून काळ्या मेघाच्या चादरी, रविराज अंबरी निजला ॥१॥
धन ओथंबूनी येता, चातकाची तृप्ती झाली,
टपोऱ्या मोत्यांची झालर, हिरव्या रानात लकलकली ॥२॥
चमकू लागल्या वीजा, बेभान झाला वारा,
दाहीदिशा धुंद होऊनी, कोसळल्या श्रावणधारा ॥३॥
नाद घुमला शिवारात, कृषीमित्रांच्या घुंगरांचा,
हर्षूनी बळीराजाने, घाट घातला पेरणीचा ॥४॥
सारूनी जलप्रपात, ओसंडून वाहे तटनी,
झाडे, झुडपे, वेली, संगे मैना गुंजती गोड गाणी ॥५॥
थोडे मळभ निसटले, थोडया सरीही स्थिरावल्या
सप्तरंगाच्या इंद्रधनुरूपी छटा, नभी अवतरल्या ॥६॥
सरीसंगे खेळ उनपावसाचा, सृष्टीने साधला
नात्यांचे बंध गुंफूनी, आल उधाण सणवाराला ॥७॥
कुठे गच्च आकाशाच्या निळया खाणी, कुठे खळखळणारे पाणी,
उडू पाहे माझे मन, निळया स्वच्छंद गगनी ॥८॥
असा हा थेंबाना पेरून मातीत,
डौलदार हा पाऊस, आणतो नवचैतन्या चरचरांत ॥९॥



–साक्षी संदीप आंग्रे,
पनवेल

# दरडप्रवण तिसे येथे संरक्षण भिंतीची प्रतीक्षा



**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील दरडप्रवण म्हणून घोषित करण्यात आलेल्या तिसे गावातील ग्रामस्थ गेल्या दोन वर्षांपासून भीतीच्या सावटाखाली जीवन जगत आहेत. दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या परिसरात सुमारे २५ ते ३० लोकवस्तीला धोका असून अनेक कुटुंबांची घरे धोक्याच्या छायेत आहेत. प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाने या भागाची पाहणी करून परिस्थितीचे गांभीर्य जाणून घेतले आहे. आता येथे संरक्षण भिंतीचे काम प्रत्यक्ष सुरू करावे, अशी मागणी होत आहे.

गतवर्षी तिसे गावात मुसळधार पावसामुळे दरड कोसळण्याची घटना घडली होती. त्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे, आमदार अनिकेत तटकरे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख यांच्यासह प्रशासनातील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती तसेच शासनाच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकानेही धोकादायक भागाची पाहणी केली होती. या पाहणीदरम्यान ग्रामस्थांना दरडप्रवण भागात योग्य नियोजन करून संरक्षण भिंत उभारण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते.

गेल्या दोन वर्षांपासून तिसे गाव दरडप्रवण गाव म्हणून घोषित आहे. दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी अनेक घरे असल्याने पावसाळ्यात ग्रामस्थांच्या जीविताचा प्रश्न निर्माण होतो. पावसाचा जोर वाढला की दरड कोसळण्याची भीती कायम असते. अशा परिस्थितीत धोकादायक भागात संरक्षण भिंत किंवा अन्य ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना अद्याप पूर्ण झालेली नसल्याने ग्रामस्थांकडून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना होण्याआधीच प्रतिबंधात्मक कामे पूर्ण करावीत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

ग्रामस्थ उमेश पांडुरंग शिगवण यांनी प्रशासनाकडे तातडीने काम सुरू करण्याची मागणी केली. ते म्हणाले, दरडीचा धोका आम्ही गेल्या दोन वर्षांपासून सहन करीत आहोत. प्रशासनाने लवकरात लवकर लक्ष देऊन काम पूर्ण करून द्यावे.

उमाजी गणपत गोरीवले, सुनील पांडुरंग शिगवण यांच्यासह अनेक ग्रामस्थांची घरे या धोकादायक परिसरात आहेत. त्यामुळे पावसाळ्यात ग्रामस्थांना सतत भीतीमध्ये राहावे लागत आहे.

दरम्यान, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी संरक्षण भिंतीच्या कामाबाबत प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की, संरक्षण भिंतीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्ह्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. त्याला मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू करण्यात येईल.

तिसे ग्रामस्थांचा प्रश्न केवळ एका संरक्षण भिंतीपुरता मर्यादित नाही, तर तो थेट ग्रामस्थांच्या जीविताच्या सुरक्षेशी संबंधित आहे. दोन वर्षांपासून दरडप्रवण म्हणून घोषित असलेल्या या गावात अजूनही अनेक कुटुंबे धोक्याच्या छायेत राहत असतील, तर प्रशासनाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. जिल्ह्यास्तरावर पाठविलेल्या प्रस्तावाला तातडीने मान्यता मिळावी, प्रशासकीय प्रक्रिया जलदगतीने पूर्ण व्हावी आणि प्रत्यक्ष संरक्षण भिंतीच्या कामाला सुरुवात व्हावी, अशी अपेक्षा तिसे ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

## ऑनलाईन पार्सल आल्याचे सांगून व्यापाऱ्याचा मोबाईल केला हॅक

**नागोठणे : बातमीदार**

नागोठण्यातील प्रसिद्ध व्यापारी मुकेश मांगीलाल जैन हे रविवारी (दि. १६) पनवेल येथे गेले असताना ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकाराला बळी पडण्याची घटना घडली. एका अनोळखी व्यक्तीने फोन करून तुमचे ऑनलाइन पार्सल आले आहे असे सांगत ओटीपी मागितला. मुकेश जैन यांनी संबंधित व्यक्तीला ओटीपी दिल्यानंतर काही वेळातच त्यांचा मोबाईल हॅक करण्यात आला.

मोबाईलचा ताबा मिळवल्यानंतर संबंधित सायबर भामट्याने मुकेश जैन यांच्या मोबाईल क्रमांकावरून त्यांच्या व्यापारी मित्र, मित्रपरिवार व नातेवाईक अशा जवळपास १५० जणांना संदेश पाठविला. हा संदेश मुकेश जैन यांनीच पाठविल्याचा भास निर्माण करण्यात आला होता. संदेशामध्ये, "हॅलो, मुझे एक हेल्प चाहिए. मेरा यूपीआय काम नहीं कर रहा है. अर्जंट ५५ हजार मेरे अकाउंट में डालो, दो घंटे में रिटर्न कर दूंगा," असे नमूद करण्यात आले होते.

काही मित्रांनी या संदेशाला प्रतिसाद देत पैसे कोणत्या खात्यावर पाठवायचे, अशी विचारणा केली असता 'गोविंद' नाव आणि ७०६१८०७९७२ हा मोबाईल क्रमांक पाठविण्यात आला. या फसवणुकीच्या प्रक्रियेत एका व्यापाऱ्याने दोन हजार रुपये पाठविल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, काही मित्रांनी मुकेश जैन यांच्या भावाशी दूरध्वनीवरून संपर्क साधून या संदेशाबाबत विचारणा केली. त्यानंतर त्यांच्या भावाच्या लक्षात काहीतरी गडबड असल्याचे आले. त्यांनी तातडीने मित्रपरिवार व नातेवाईकांना याबाबत माहिती देत कोणत्याही प्रकारचे पैसे पाठवू नका, असे आवाहन केले. त्यामुळे मोठी सतर्कता बाळगल्याने लाखो रुपयांची संभाव्य ऑनलाइन लूट टळली.

या घटनेमुळे ओटीपी, यूपीआय आणि मोबाइल हॅकिंगच्या माध्यमातून होणाऱ्या सायबर फसवणुकीचा धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

**नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन**

अनोळखी व्यक्तीने पार्सल, बँक खाते, केवायसी, यूपीआय किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी फोन केल्यास ओटीपी, यूपीआय पिन, एटीएम/डेबिट कार्डची माहिती किंवा अन्य गोपनीय माहिती कधीही देऊ नये. तसेच आपल्या ओळखीच्या व्यक्तीच्या मोबाईल क्रमांकावरून पैशांची मागणी करणारा संदेश आल्यास पैसे पाठविण्यापूर्वी त्या व्यक्तीशी थेट फोनवरून संपर्क साधून खात्री करावी. 'ओटीपी सांगितला, तर फसवणुकीचा दरवाजा उघडला' त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून सायबर भामट्यांच्या जाळ्यात अडकू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

## माथेरानमध्ये घोड्यांसाठी विशेष आरोग्य शिबिर; औषधांचे वाटप

**कर्जत, माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान या पर्यटनस्थळी प्रमुख प्रवासी वाहन असलेल्या घोड्यांचे आरोग्य सुदृढ राहावे या उद्देशाने रायगड जिल्हा परिषद पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकारातून अश्व महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी सर्व अश्वचालकांना मोफत औषधे वाटप कारण्यात आली.

माथेरानमध्ये घोड्याच्या व्यवसायावर चाळीस टक्के स्थानिकांचा उदरनिर्वाह चालतो. अशा पोशिंद्याच्या आरोग्यावर पशुसंवर्धन विभागाने विशेष लक्ष केंद्रित करून येथील प्रीती हॉटेल या ठिकाणी अश्वपालकांना औषधे वाटप करून घोड्यांचे लसीकरण, सरा, ग्लँडर्स या रोगाची तपासणी करण्यात आली.

पावसाळ्यात घोडे तबेल्यात बांधून असल्याने अनेक व्याधीने ते बाधीत होतात, जंताने ग्रासले जातात. त्यामुळे जंताचे औषध मोफत देण्यात आले. सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी समाजकल्याण समिती सभापती नारायण डामसे, जिल्हा परिषद सदस्य बाबू घारे, सुवर्णा ठाकरे, सुनिता मोरे, वर्षा दोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रियदर्शनी मोरे, डॉ.सचिन देशपांडे, डॉ.शामराव कदम, डॉ.अजय कांबळे, सुदर्शन मुंडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सभापती वैकुंठ पाटील यांनी, माथेरानमध्ये सर्वाधिक जास्त पशुधन असून अश्वाच्या आरोग्याला प्रथम प्राधान्य देण्यात आले आहे तसेच दवाखान्याय सुधारणा करून अद्ययावत करण्यावर भर दिला जाणार आहे. येथील सर्व अश्वपालकांना मोफत औषधे दिली जात आहेत. अश्वांसाठी सदैव पशुधन विभाग तत्पर असणार आहे, असा शब्द यावेळी दिला.

माथेरानसाठी प्रभारी डॉक्टरांची नियुक्ती गेली दोन वर्षांपासून माथेरानमध्ये पशुधन विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती नव्हती, पण वैकुंठ पाटील सभापती झाल्यानंतर त्यांनी तातडीने माथेरानसाठी प्रभारी डॉक्टरांची नियुक्ती केली असून डॉक्टर कामावर रूजू झाल्याने स्थानिक अश्वपाल संघटनेने समाधान व्यक्त केले.

माथेरानमधील घोड्यांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि अश्वपालकांना वैद्यकीय आवश्यक सेवा सुविधा मिळाव्यात या उद्देशाने आयोजितया शिबिरात घोड्यांची आरोग्य तपासणी करून अश्वपालकांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. मुसळधार पावसामुळे नियोजित ठिकाण बदलूत प्रीती हटिल येथे शिबिर घेण्यात आले. शिबिरात घोड्यांचे लसीकरण,सरा व ग्लॅडर्स रोगाची तपासणी करण्यात आली तसेच पावसाळ्यात होणाऱ्या आजारांपासून संरक्षणासाठी जंतनाशक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले.

जिल्ह्यातील सुमारे ३० पशुवैद्यकीय डॉक्टर या उपक्रमात सहभागी झाले होते. ४६० प्रवासी आणि १४० मालवाहू घोड्यांची या शिबिरात तपासणी करून उपचार देण्यात आले.

## नारळ फोडी स्पर्धेत ग्रंथ नाखवा प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

श्री शितळादेवी मित्र मंडळाच्या वतीने स्व. चिंतामण गुरव व स्व. कमलाकर घरत यांच्या स्मरणार्थ नारळ फोडी स्पर्धा चौल शितळादेवी मंदिरासमोरील प्रांगणात उत्साहात झाली. स्पर्धेला परिसरातील नागरिक व स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे नियोजन केदार मळेकर यांनी केले होते. उद्घाटन अॅड. प्रशांत वर्तक, अजित गुरव, मारुती भगत, नंदकुमार वर्तक, राजेंद्र गुरव, संदीप गुरव,आणि प्रवीण पाटील यांच्या उपस्थितीत झाले.



स्पर्धेत प्रथम क्रमांक ग्रंथ नाखवा यांनी पटकावला. त्यांना तीन हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. द्वितीय क्रमांक स्वप्नील-पंकज यांनी मिळविला असून त्यांना दोन हजार रुपये व ट्रॉफी, तर तृतीय क्रमांक मुकेश बामजी यांनी मिळवित एक हजार रुपये व ट्रॉफी जिंकली. याशिवाय उत्कृष्ट मारेकरी म्हणून रुद्र किर यांची निवड करण्यात आली. स्पर्धेचे बक्षीस वितरण सुरेंद्र म्हात्रे व नंदकुमार वर्तक यांच्या हस्ते झाला.

स्पर्धेत गुण लेखनाचे काम दिपेश पाटील, हेमंत पाटील व प्रसाद पाटील यांनी पाहिले.



## आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, खाऊवाटप

**मुरूड : प्रतिनिधी**

शिक्षणामुळे जीवनात प्रगती करता येते. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांसारख्या समाजसुधारकांनी शिक्षणाला विशेष महत्त्व दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन प्रगती करावी आणि आपल्या गावाचे नाव मोठे करावे, असे आवाहन सतीष गवस यांनी केले.

८०व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन आणि जंजिरा मेडिकल असोसिएशन यांच्या माध्यमातून तसेच धर्माज क्रॉप सायन्स आणि शेतकरीमित्र कृषिसेवा केंद्र पेण यांच्या वतीने मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा, शिघ्रे येथील १०० आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. त्यावेळी गवस बोलत होते.

कार्यक्रमास अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन व जंजिरा मेडिकल असोसिएशन अध्यक्ष -संजय पाटील, शिघ्रे सरपंच गुलाब वाघमारे, डॉ. अर्चना पाटील, डॉ. मयुर कल्याणी, डॉ. आदेश मोकल, विष्णू ऐनकर, डॉ. मंगेश पाटील, डॉ. राज कल्याणी, हाफीज कबले, अमोल पाटील, डॉ. वसीम पेशमाम, सुनील पटेल, डॉ. शकील परदेशी, डॉ. अमित बेनकर, डॉ. संदेश पाटील, डॉ. अनंत जोशी, मुख्याध्यापक संजय जंजिरकर यांच्यासह शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते.

धर्माज क्रॉप सायन्स कंपनीच्या सीएसआर निधीतून हा उपक्रम राबविण्यात आला. शैक्षणिक साहित्य व खाऊ मिळाल्याने शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## लोकशाही मूल्ये, शिस्त आणि जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रूजवा -सचिन हिरे



**खोपोली : प्रतिनिधी**

प.पू. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, खोपोली येथे विद्यार्थी नेतृत्व परिषद २०२६-२७चा पदग्रहण व शपथविधी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, शिस्त, जबाबदारी, सेवाभाव तसेच लोकशाही मूल्यांची जडणघडण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सचिन शांताराम हिरे, हेल्प फाउंडेशनचे गुरूनाथ साठेलकर, केटीएसपी मंडळाचे उपाध्यक्ष अबूबकर जळगावकर, पी.पी. गगनगिरी महाराज इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे अध्यक्ष दिनेश गुरव, विश्वस्त राजेश अभाणी, प्राचार्य डॉ. गौरव एन. तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन शांताराम हिरे यांनी विद्यार्थी नेतृत्व परिषद निवडणूक ही केवळ पदे निवडण्याची प्रक्रिया नसून विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारी प्रक्रिया असल्याचे सांगितले.

डॉ. गौरव तिवारी यांनी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना विद्यार्थी नेतृत्व परिषदेच्या सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी परिधान केलेला बॅज हा अधिकाराचे नव्हे, तर जबाबदारीचे प्रतीक असल्याचे स्पष्ट केले.

**विद्यार्थ्यांचे पदग्रहण**

यावेळी विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना बॅज व सॅश प्रदान करून त्यांच्या जबाबदाऱ्या अधिकृतपणे सोपविण्यात आल्या. मास्टर सार्थक बाबासाहेब खोजे आणि एलेना राजू इलंजीकल यांनी अनुक्रमे हेड बॉय आणि हेड गर्ल म्हणून पदभार स्वीकारला. त्याचप्रमाणे मास्टर प्रेम अनिल भालेराव आणि अनन्या महेश पाटील यांनी उपविद्यार्थी प्रमुख म्हणून पदग्रहण केले. याशिवाय सांस्कृतिक, आरोग्य, वित्त व शिस्त मंत्री, विविध हाऊसचे कॅप्टन, उपकॅप्टन आणि प्रीफेक्ट्स यांनाही पदचिन्हे प्रदान करण्यात आली.

## तटकरे महाविद्यालयात विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

द.ग. तटकरे महाविद्यालय माणगाव येथे ग्रंथालय विभागाकडून डॉ. एस.आर. रंगनाथन ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक फादर ऑफ लायब्ररी सायन्स यांची १३४वी जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासोबतच गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजेंद्र आचार्य होते. प्रमुख पाहुणे म्हणून माणगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय बांगर, उपनिरीक्षक पूजा वराडे उपस्थित होते. ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. संगीता गंगाराम उतेकर यांनी प्रास्ताविकातून डॉ. रंगनाथन यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत आधुनिक ग्रंथालय व्यवस्थेच्या विकासातील त्यांच्या अमूल्य योगदानाची माहिती दिली. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाचन, ज्ञानसंपादन, शिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यास यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयातील उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करून आपल्या ज्ञानात व गुणवत्तेत वाढ करावी, असे आवाहन त्यांनी केले.


जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या बुक बँक (पुस्तकपेढी) योजनेंतर्गत प्राप्त अनुदानातून खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांचे गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमास ग्रंथालय विभागातील कर्मचारी नंदू जाधव, जानवी वाघमारे व साईराज मोरे, ग्रंथालय सल्लागार समितीचे सदस्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## रहाटाड प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना इंग्रजीचे धडे; इंग्लिश लॅब सुरू

**तळा : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून तळा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा रहाटाड येथे सभापती नथुराम मुकण यांच्या हस्ते इंग्लिश लॅबचे उद्घाटन करण्यात आले. यामुळे विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांमध्ये उत्साह दिसून आला.



या कार्यक्रमास सभापती नथुराम मुकण, उपसरपंच गिरणे, नागेश लोखंडे, मुख्याध्यापक गौतम मनवर, रहाटाड सरपंच मिताली करंजे, अंकुश दर्गे, कोळी समाज अध्यक्ष खेळाराम पाटील, बौद्ध समाज अध्यक्ष पांडुरंग गवाने, सामाजिक कार्यकर्ते सौरभ खंडागळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

शासनाकडून ग्रामीण व जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांनाही इंग्रजीचे ज्ञान मिळावे या दृष्टीने रायगड जिल्हा परिषदेकडून पाच संगणक देण्यात आले आहेत. त्यामध्ये इंग्रजी अभ्यासक्रम व उपक्रम देण्यात आले आहेत. त्याद्वारे चांगल्या पध्दतीने इंग्रजी शिक्षण विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

यावेळी सभापती नथुराम मुकणे म्हणाले की, शाळेला इंग्रजी लॅब मिळाल्याने विद्यार्थ्यांना इंग्रजीचे चांगले ज्ञान मिळणार आहे. त्यांचे इंग्रजी सुधारण्यास मदत होईल.

## ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांना पुरस्कार

**पोलादपूर : प्रतिनिधी**

सुजय फाउंडेशन आणि मैत्री रक्ताची यांच्या वतीने सुजय सकपाळ यांच्या तेराव्या स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा, मोफत आयुर्वेदिक तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकार व रक्तदाते शैलेश पालकर यांना सेवारत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास निवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक विठ्ठल जाधव, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अप्पर आयुक्त आरआरएस शिवकुमार साळुंखे, महापालिकेचे विरोधी पक्षनेते निलेश



निकम, उद्योजक किसन भोसले, विद्या जाधव, कस्टम अधिकारी स्नेहल खैरे, अप्पर राज्यकर आयुक्त उमाकांत बिराजदार, सुधीर सकपाळ, उमेश सकपाळ, सुजय प्रतिष्ठानचे प्रमुख सुरेश सकपाळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# गॉल कसोटी रंगतदार अवस्थेत

## श्रीलंकेला २८८ धावांची, तर भारताला सहा विकेट्सची गरज

**गॉल : वृत्तसंस्था**

भारत-श्रीलंका यांच्यातील गॉल कसोटी आता निर्णायक वळणावर पोहचली आहे. चौथ्या दिवसाअखेर श्रीलंकेने दुसऱ्या डावात ३४ षटकांत चार विकेट्स गमावत ८४ धावा केल्या आहेत. यजमान श्रीलंकेला विजयासाठी आणखी २८८ धावांची गरज आहे, तर भारतीय संघ विजयापासून अवघ्या सहा विकेट्स दूर आहे. पाचव्या आणि अखेरच्या दिवशी पावसाचा व्यत्यय आला नाही, तर टीम इंडियाचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.



चौथ्या दिवशी भारतीय संघाने आपल्या दुसऱ्या डावाची सुरुवात केली. यशस्वी जैस्वाल खातेही न उघडता माघारी फिरल्यावर उपकर्णधार लोकेश राहुल आणि देवदत्त पडिक्कल जोडीने दुसऱ्या विकेटसाठी उपयुक्त अशी ६५ धावांची भागीदारी रचली. राहुलने ३५ धावा तर पडिक्कलने ४४ धावांचे योगदान दिले.

मग रवींद्र जडेजा आणि ऋषभ पंत यांनी दुसऱ्या डावातील दुसरी अर्धशतकी भागीदारी रचली. या दोघांनी सहाव्या विकेटसाठी ६० चेंडूत ५४ धावा केल्या. यात जडेजाच्या फक्त सात धावा होत्या. पंतच्या आक्रमक अर्धशतकी खेळीमुळे भारतीय संघाने सामन्यावरील पकड अधिक मजबूत केली. त्याने ६९ चेंडूत केलेल्या ६६ धावांच्या खेळीच्या जोरावर टीम इंडियाने दुसऱ्या डावात १९३ धावांपर्यंत मजल मारली. पहिल्या डावातील १७२ धावांची आघाडीच्या जोरावर टीम इंडियाने यजमानांसमोर ३७२ धावांचे लक्ष्य दिले आहे.

दरम्यान, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप गुणतालिकेत ऑस्ट्रेलिया ७७.७८ विजयी टक्केवारीसह पहिल्या, दक्षिण अफ्रिका ७५ विजयी टक्केवारीसह दुसऱ्या, न्यूझीलंड ७२.२२ विजयी टक्केवारीसह तिसऱ्या आणि बांग्लादेश ६६.६७ विजयी टक्केवारीसह चौथ्या स्थानावर आहे. भारतीय संघ ४८.१२ विजयी टक्केवारीसह पाचव्या, तर श्रीलंकन संघ ४१.६७ विजयी टक्केवारीसह सहाव्या स्थानावर आहे. त्यामुळे पहिल्या सामन्यातील निकालाचा हमखास परिणाम गुणतालिकेत दिसून येईल. म्हणूनच दोन्ही संघांसाठी या सामन्यातील निकाल महत्त्वाचा आहे.

# ॲथलेटिक्स स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा युनिव्हर्सिटी ऑफ स्पोर्ट्स पॅव्हिलियन, मरीन लाइन्स येथे नुकताच झाली. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींची उल्लेखनीय कामगिरी करत पदकांची कमाई केली.



सिया पाटील हिने मुलींच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत आणि उंच उडी स्पर्धेतही सुवर्णपदक पटकाविले. १८ वर्षांखालील मुलींच्या ॲथलेटिक्स स्पर्धेत आर्या तेलगे हिने १०० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक पटकाविले. केया पटेलने ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक मिळवले, तर इशिता खानसोळे हिने १०० मीटर अडथळा शर्यतीत आणि २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. त्यांना प्रशिक्षक सूरज पाटील आणि अंजली कुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थिनींची राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा रत्नागिरी येथे होणार आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी यशस्वी विद्यार्थिनी व त्यांच्या मार्गदशकांचे अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# जलतरण स्पर्धेत रामशेठ ठाकूर कॉलेजच्या मिथिला म्हात्रेला दुहेरी पदक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रथम वर्षाची विद्यार्थिनी मिथिला सचिन म्हात्रे हिने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

उरण येथील श्रीमंत बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धामध्ये मिथिला हिने मुलींच्या ओपन कॅटेगिरीमध्ये सहभाग घेत आपल्या उत्कृष्ट जलतरण कौशल्याचे दर्शन घडविले. मिथिलाने ५० मीटर फ्री स्टाईल या वैयक्तिक प्रकारात रौप्यपदक जिंकले, तर ४ बाय १०० मीटर फ्री स्टाइल रिले या सांघिक प्रकारात सुवर्णपदक पटकावले.

या दुहेरी यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे, प्रा.डॉ. रित ठुले, शिक्षकवृंद, क्रीडा विभाग आणि सर्व विद्यार्थी यांच्या वतीने मिथिलाचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अलिबागमध्ये मोफत तलवारबाजी प्रशिक्षण

**नागोठणे : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलात तलवारबाजी या खेळाचे विनामूल्य प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

या प्रशिक्षण वर्गात सहाय्यक क्रीडा विकास अधिकारी संदीप गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली इच्छुक विद्यार्थी व खेळाडूंना तलवारबाजीचे शास्त्रशुद्ध व तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील विद्यार्थी व खेळाडूंना तलवारबाजीमध्ये प्रावीण्य मिळविण्यासोबतच जिल्हा, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

जिल्ह्यातील इच्छुक विद्यार्थी, खेळाडू तसेच पालकांनी या विनामूल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी संदीप गुरव (९९६०७०२५१०) किंवा रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.

# ऋषभ पंतने रचला नवा इतिहास

## कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद षटकारांचे शतक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गॉल कसोटीतील दुसऱ्या डावात भारताचा विकेटकीपर-बॅटर ऋषभ पंतने षटकार ठोकत अर्धशतक साजरे केले. यासोबतच त्याने एका खास शतकी विक्रमाला गवसणी घातली. कसोटी क्रिकेटमध्ये भारताकडून १०० षटकार पूर्ण करणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला. एवढेच नाही, तर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद १०० षटकार पूर्ण करण्याचा विश्वविक्रमही पंतच्या नावावर झाला आहे.

श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीपूर्वी ऋषभ पंतच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये ९७ षटकार होते. गॉलमध्ये सुरू असलेल्या पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात पंतच्या बॅटमधून एक षटकार मारला. दुसऱ्या डावात त्याने षटकारासह अर्धशतक पूर्ण करत १०० षटकारांचा पल्ला गाठला. कसोटी क्रिकेटमध्ये शंभर षटकार मारणारा तो पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. पंतने दुसऱ्या डावात ६९ चेंडूत ६६ धावांची खेळी केली. यात त्याने आठ चौकारांसह दोन षटकार खेचले.

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात १०० षटकार मारणारा पंत चौथा खेळाडू आहे. याआधी इंग्लंडचा बेन स्टोक्स, न्यूझीलंडचा ब्रेंडन मॅक्युलम आणि ऑस्ट्रेलियाचा ॲडम गिलख्रिस्ट यांनी हा पराक्रम केला होता. या तिघांपेक्षा कमी डावात षटकारांचा शतकी डाव साधत पंतने खास विश्वविक्रमही रचला आहे.

पंतने ८९व्या डावात कसोटीत १०० षटकार पूर्ण केले. गिलख्रिस्टने १३० डावात, बेन स्टोक्सने १५१ डावात आणि मॅक्युलम याने १७० डावात हा टप्पा गाठला होता.

# सामन्यादरम्यान क्रिकेटर दिनेश चंदिमल जायबंदी



**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंका यांच्यात पहिला कसोटी सामना सुरू आहे. या सामन्याच्या चौथ्या दिवशी एक भयानक प्रसंग मैदानात घडला. मैदानात फिल्डिंग करताना श्रीलंकन क्रिकेटर दिनेश चंदिमल गंभीर जखमी झाला. यानंतर त्याला उपचारासाठी रुग्णालयात न्यावे लागले.

मॅचच्या चौथ्या दिवशी चौकार अडवण्याच्या प्रयत्नात त्याच्या मानेला दुखापत झाली. दिनेशने चेंडू अडवण्यासाठी झेप घेतली, पण त्याचा खांदा आणि मान विचित्र स्थितीत मुरगळली. या घटनेनंतर दिनेश वेदनेने विव्हळताना आणि वारंवार आपली मान व खांदा धरताना दिसला. त्याच वेदनेने तो मैदानाबाहेर गेला. मग पुढील तपासणीसाठी त्याला रुग्णालयात नेण्यात आले.

श्रीलंका क्रिकेट संघाने या घटनेवर भाष्य करताना सांगितले की, टीमचे फिजिओथेरपिस्ट आणि डॉक्टरांनी मैदानावरच दिनेशची तपासणी केली आणि खबरदारीचा उपाय म्हणून त्याला स्कॅनसाठी रुग्णालयात नेण्यात आले आहे. स्कॅनचे निकाल उपलब्ध झाल्यावर त्याच्या दुखापतीबद्दल माहिती दिली जाईल. दरम्यान, दिनेशच्या जागी पासिनदू सूरियाबंदारा याचा संघात समावेश करण्यात आला आहे.

# रोनाल्डोच्या निवृत्तीचे संकेत



**मुंबई : प्रतिनिधी**

फुटबॉल विश्वातील महान खेळाडूंपैकी एक असलेला क्रिस्टियानो रोनाल्डो लवकरच आपल्या २५ वर्षांच्या शानदार कारकिर्दीला पूर्णविराम देण्याच्या तयारीत आहे. रोनाल्डोने २०२६-२७ हा हंगाम आपल्या व्यावसायिक फुटबॉल कारकिर्दीतील अखेरचा हंगाम ठरू शकतो, असे स्पष्ट संकेत दिले आहेत.

४१ वर्षीय रोनाल्डो सध्या सौदी अरेबियातील अल-नस्र क्लबकडून खेळत असून त्याचा करार जून २०२७पर्यंत आहे. एका मुलाखतीत रोनाल्डोने म्हटले, हा कदाचित माझ्या फुटबॉल कारकिर्दीतील शेवटचा वर्ष असेल आणि मला एक शानदार वारसा मागे ठेवायचा आहे.

रोनाल्डोने निवृत्तीनंतरच्या आयुष्याचे नियोजनही सुरू केले आहे. कुटुंबासोबत अधिक वेळ घालवणे, प्रवास करणे, पॅडेल खेळणे आणि सामने पाहणे यासाठी वेळ देणार असल्याचे त्याने सांगितले. "फुटबॉल सोडल्यानंतर आयुष्यात मोठी पोकळी निर्माण होऊ शकते. त्यामुळे तो वेळ अनेक वेगवेगळ्या गोष्टींनी भरावा लागेल. मला अधिक प्रवास करायचा आहे, पॅडेल खेळायचे आणि पाहायचे आहे," असे रोनाल्डो म्हणाला.

**१००० गोलच्या विक्रमाचे लक्ष्य**

रोनाल्डोसमोर आणखी एक मोठे लक्ष्य आहे. त्याच्या वरिष्ठ कारकिर्दीत एक हजार गोलचा टप्पा गाठण्यासाठी तो सध्या २४ गोलांनी दूर आहे. हा ऐतिहासिक विक्रम आपल्या कारकिर्दीच्या अखेरीस गाठण्याची त्याची इच्छा आहे.

# विश्वविजेती आणि आता अर्जुन पुरस्काराची मानकरी; नागपूरच्या दिव्या देशमुखचा यशस्वी प्रवास

**नागपूर : प्रतिनिधी**

बुद्धिबळाच्या पटावर गेल्या काही वर्षांत सातत्याने ठसा उमटविणाऱ्या नागपूरच्या दिव्या देशमुखच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२५ अंतर्गत दिव्या देशमुखची अर्जुन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

केंद्र सरकारने मंगळवारी राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. बुद्धिबळपटू विदित गुजराथीसह दिव्याचीही अर्जुन पुरस्कारासाठी निवड झाली आहे. यंदा एकूण १७ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

नागपूरमध्ये जन्मलेल्या दिव्याने वयाच्या पाचव्या वर्षी बुद्धिबळाचे धडे घेण्यास सुरुवात केली. तिच्या आई-वडिलांचा व्यवसाय वैद्यकीय क्षेत्रातील असला तरी दिव्याने बुद्धिबळाची निवड केली आणि त्यातच आपली कारकीर्द घडवली. सातव्या वर्षी तिने राष्ट्रीय अंडर-७ विजेतेपद मिळवले. त्यानंतर जागतिक युवा स्पर्धांमधील यशाची मालिका सुरू राहिली. २०२१मध्ये तिने वुमन ग्रँडमास्टरचा किताब मिळवला,



तर २०२३मध्ये इंटरनॅशनल मास्टरचा किताब मिळवला. २०२२मध्ये तिने भारतीय महिला अजिंक्यपदही जिंकले. २०२३मध्ये आशियाई महिला अजिंक्यपदावर नाव कोरत तिने वरिष्ठ स्तरावरील आपली क्षमता सिद्ध केली.

अशा प्रकारे बालवयातील जागतिक विजेतेपदांपासून ज्युनियर विश्वविजेतेपद, ऑलिम्पियाड सुवर्णपदक आणि अखेर महिला विश्वचषक विजेतेपदापर्यंत दिव्याचा प्रवास झाला आहे. आता अर्जुन पुरस्काराच्या रूपाने तिच्या या सातत्यपूर्ण आंतरराष्ट्रीय कामगिरीवर राष्ट्रीय पातळीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

**सातत्यपूर्ण कामगिरीची पावती**

दिव्यासाठी हा केवळ पुरस्कार नसून गेल्या काही वर्षांतील तिच्या सातत्यपूर्ण कामगिरीची पावती आहे. अवघ्या पाचव्या वर्षी बुद्धिबळाला सुरुवात करणाऱ्या दिव्याने अल्पावधीतच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. बालवयातच तिने जागतिक युवा स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवले. २०१४मध्ये अंडर-१० आणि २०१७मध्ये अंडर-१२ जागतिक विजेतेपद पटकावल्यानंतर २०२४मध्ये तिने अंडर-२० जागतिक ज्युनियर मुलींच्या स्पर्धेतही सुवर्णपदक मिळवले. २०२४च्या या स्पर्धेत दिव्याने ११पैकी १० गुण मिळवत अजिंक्य राहत विजेतेपद मिळवले.

# वेगाने गाडी चालवणाऱ्याला रोहित शर्माने झापले!




**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज रोहित शर्मा मैदानातील त्याच्या स्फोटक फलंदाजीसोबतच मैदानाबाहेर त्याच्या बिनधास्त आणि दिलखुलास स्वभावासाठी ओळखला जातो. चाहत्यांशी संवाद साधतानाची त्याची खास मुंबई स्टाईल आणि आपुलकी नेहमीच सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरते. नुकताच रोहितचा एक नवीन व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो वेगाने गाडी चालवणाऱ्या एका व्यक्तीला काळजीपोटी झापताना दिसत आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओनुसार रोहित शर्मा आपल्या चाहत्यांना भेटत असताना आणि त्यांच्याशी संवाद साधत असताना ही घटना घडली. रोहित चाहत्यांना ऑटोग्राफ देण्यात आणि त्यांच्यासोबत फोटो काढण्यात व्यस्त होता. यावेळी तो त्या व्यक्तीला, "इतना तेज चलाते हो गाडी यार", असे म्हणताना ऐकू येतो. त्यामुळे संबंधित व्यक्तीने गाडी वेगाने चालवली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

रोहित शर्माचा हा व्हिडीओ तुफान व्हायरल झाला असून या व्हिडीओवर लाईक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत आहे. हिटमॅनचा हा अंदाज खराखुरा आणि मन जिंकणारा आहे, अशा प्रतिक्रिया दिल्या जात आहेत.



# सूर्याबंदाराचा भन्नाट झेल

**कोलंबो : वृत्तसंस्था**

गॉलच्या मैदानावर सुरू असलेल्या कसोटी सामन्यात भारताच्या रवींद्र जडेजाला बाद करण्यासाठी श्रीलंकेच्या पसिंदू सूर्याबंदाराने भन्नाट झेल टिपला. त्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

४३व्या षटकातील तिसरा चेंडू लहिरू कुमाराने शॉर्ट टाकला. या चेंडूवर जडेजाने मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू बॅटची कडा घेऊन हवेत गेला. त्यावेळी डीप बॅकवर्ड स्क्वेअरला क्षेत्ररक्षण करत असलेल्या पसिंदू सूर्याबंदाराने डाईव्ह मारली आणि भन्नाट कॅच घेतला.

# देवदत्त पडिक्कलच्या गर्लफ्रेंडची रंगली चर्चा

## सोशल मीडियावर फोटो व्हायरल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या गॉल कसोटी सामन्यात भारतीय फलंदाज देवदत्त पडिक्कलने आपल्या उत्कृष्ट फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पहिल्या डावात १६७ धावांची दमदार शतकी खेळी केल्यानंतर दुसऱ्या डावातही त्याने ४४ धावांची संयमी खेळी केली. गॉलच्या मैदानावर पडिक्कलच्या फलंदाजीचे कौतुक होत असतानाच दुसरीकडे सोशल मीडियावर त्याच्या वैयक्तिक आयुष्याची आणि कथित गर्लफ्रेंडची जोरदार चर्चा रंगली आहे.



सोशल मीडियावरील विविध पोस्ट्स आणि चर्चांनुसार देवदत्त पडिक्कलच्या गर्लफ्रेंडचे नाव रियांजली नानजप्पा असल्याचे सांगितले जात आहे. रियांजली ही पेशाने एक डिझायनर आणि पॉटरी आर्टिस्ट (मातीची भांडी व कलाकृती बनवणारी कलाकार) आहे. गॉल कसोटी सामन्यादरम्यान रियांजली स्टेडियममध्ये उपस्थित असल्याचे काही फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

पडिक्कलने १६७ धावांची पुनरागमनाची खेळी खेळल्यावर रियांजलीने दिलेल्या प्रतिक्रियांचा व्हिडीओही चर्चेत आला तसेच पडिक्कलचे द्विशतक हुकल्यानंतर ती काहीशी निराश दिसल्याचेही चाहत्यांनी नोंदवले.

सोशल मीडियावर या दोघांच्या नात्याबद्दल आणि अफेअरबद्दल उधाण आले असले, तरी क्रिकेटर देवदत्त पडिक्कल किंवा रियांजली नानजप्पा या दोघांपैकी कोणीही आपल्या नात्याबाबत अधिकृत वक्तव्य केलेले नाही. सध्या या सर्व चर्चा केवळ सोशल मीडियावरील दावे आणि अफवांवर आधारित आहेत.

मैदानावर पडिक्कलने दोन्ही डावांत मिळून २११ धावा करत पुनरागमन सिद्ध केले असून मैदानाबाहेर रियांजलीसोबतच्या त्याच्या नात्याची चर्चा चाहत्यांमध्ये उत्सुकतेचा विषय ठरली आहे.



# ट्रॉफी घेऊन बटलरचा भांगडा डान्स

**लंडन : वृत्तसंस्था**

द हंड्रेड लीग स्पर्धेत संजीव गोयंका यांच्या मालकीच्या मँचेस्टर सुपर जायंट्स संघाने अंतिम सामन्यात ट्रेंट रॉकेट्स संघाचा धुव्वा उडवला आणि पहिल्यांदाच जेतेपदाचा मान पटकावला. यानंतर कर्णधार जोस बटलरने ट्रॉफीसोबत केलेल्या भन्नाट डान्सचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

जोस बटलर आपल्या शांत स्वभावासाठी आणि आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो, पण त्याला मैदानावर गोंधळ घालताना तुम्ही आजवर पाहिले नसेल. द हंड्रेड लीग स्पर्धेतील अंतिम सामना जिंकल्यानंतर त्याने भांगडा डान्स केला.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com